RNI : MAHMAR/2022/88796

www.vidarbhkesari.com  Vidabh Kesari News  90969 45629  @vidarbhkesari

vidarbhkesari21@gmail.com

अमरावती

२ सोमवार फेब्रुवारी २०२६

✲ वर्ष ५ ✲ अंक २४८

✲ पृष्ठ : ४ ✲ मूल्य रु : ३

दैनिक

# विदर्भ केसरी

विदर्भाचा मानबिंदू

मुख्य संपादक : अमोल कंटाळे

www.vidarbhkesari.com

## अर्थसंकल्पामुळे नवी गती - पंतप्रधान नरेंद्र मोदी



■ पंतप्रधान मोदींनी रविवारी अर्थसंकल्पावर बोलताना सांगितले की, 'देशात सुधारणा एक्सप्रेस धावू लागली आहे. जे बदल करण्यात आले आहेत, ते अभिव्यक्तीने भरलेल्या भारताच्या धाडसी आणि प्रतिभावान तरुणांना मोकळे आकाश देतात.' ते म्हणाले की, अर्थसंकल्पामुळे सुधारणांना नवी गती मिळेल. हा कौशल्य, प्रमाण आणि शाश्वतता (टिकाऊपणा) मजबूत करण्याचा प्रयत्न आहे. सर्वात मोठे भांडवल म्हणजे नागरिक, यातच गुंतवणूक केली. पंतप्रधानांनी सांगितले की, हा एक असा अनोखा अर्थसंकल्प आहे, ज्यात वित्तीय तूट कमी करण्यावर लक्ष केंद्रित केले आहे. यासोबतच अर्थसंकल्पात उच्च भांडवली खर्च (कॅपॅक्स) आणि उच्च वाढीचा समन्वय आहे. हे देशाच्या जागतिक भूमिकेला नव्याने बळकट करते.

### काय झालं स्वस्त ?

■ क्रीडा साहित्य

■ सरकारने यंदाच्या बजेटमध्ये बाजारात उपलब्ध होणाऱ्या क्रीडा विषयक वस्तू स्वस्त केल्या आहेत. त्यामुळे या वस्तूंची बाजारातील मागणी वाढण्याची शक्यता आहे.

**औषधे** आता देशात औषधे स्वस्त मिळणार आहेत. निर्मला सीतारमण यांनी आपल्या भाषणात मधुमेह, कॅन्सर सारख्या आजारावरील औषधे स्वस्त करणार असल्याची घोषणा केली आहे. त्यामुळे आता या आजारांचे उपचार स्वस्त होणार आहेत.

**मोबाईल आणि इलेक्ट्रॉनिक्स**

मोबाईल फोन्स, चार्जेस आणि सुटे भाग यांच्यावरील आयात शुल्कात कपात केल्याने नामवंत ब्रँडचे फोन स्वस्त होणार आहेत.

**सोनं आणि चांदी**

सीमा शुल्कात (Customs Duty) बदल केल्याने सोन्या-चांदीच्या दागिन्यांच्या किमतीत घसरण पाहायला मिळू शकते.

**इलेक्ट्रिक वाहने (EV):**

लिथियम-आयन बॅटरीवरील टॅक्स कमी केल्याने ई-बाईक आणि ई-कारच्या किंमती कमी होतील.

### काय झालं महाग ?

तंबाखू आणि सिगारेट, आयातित फर्निचर, काही प्लास्टिक वस्तू, पेट्रोकेमिकल्स आयातित दागिने

# स्वावलंबी भारतासाठी तिजोरी उघडली

## अर्थमंत्री निर्मला सीतारामण यांनी नवव्यांदा सादर केला अर्थसंकल्प

▸विदर्भ केसरी।

**केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामण यांनी संसदेत आपला नववा केंद्रीय अर्थसंकल्प सादर केला आहे. या बजेटमध्ये देशाच्या सर्वांगीण विकासासाठी सरकारने तीन महत्त्वाचे कर्तव्य निश्चित केल्याचे त्यांनी सांगितले. विकास, लोकांच्या वाढत्या आकांक्षा आणि 'सबका साथ, सबका विकास' या तीन सूत्रांवर हे बजेट आधारित असल्याचे त्यांनी सांगितले.**

या अर्थसंकल्पात रोजगारनिर्मिती, आरोग्य सेवा, गुंतवणूक आणि पायाभूत सुविधा (इन्फ्रास्ट्रक्चर) यांना विशेष प्राधान्य देण्यात आले आहे. तरुणांसाठी रोजगाराच्या संधी वाढवणे, आरोग्य सेवांचा दर्जा सुधारणा आणि उद्योगांना चालना देण्यासाठी गुंतवणुकीला प्रोत्साहन देण्यावर सरकारचा भर आहे.

यासोबतच जागतिक पातळीवरील आर्थिक अनिश्चितता आणि देशांतर्गत मागणी यांचा समतोल साधण्यासाठीही सरकारने काही महत्त्वाचे निर्णय जाहीर केले आहेत. अर्थव्यवस्था स्थिर ठेवत विकासाचा वेग कायम राखणे, हे या बजेटचे प्रमुख उद्दिष्ट असल्याचे अर्थमंत्र्यांनी नमूद केले एकूणच, सर्वसामान्य नागरिकांचे जीवनमान सुधारण्याच्या दृष्टीने आणि देशाच्या दीर्घकालीन प्रगतीसाठी हा अर्थसंकल्प महत्त्वाचा मानला जात आहे. सरकारने पायाभूत सुविधा कंपन्यांना पाठिंबा देण्यासाठी पायाभूत सुविधा जोखीम निधी तयार करण्याची घोषणा केली आहे. यामुळे ५,००,००० पेक्षा जास्त लोकसंख्या असलेल्या शहरांच्या पायाभूत सुविधांनाही चालना मिळेल. २०२६-२७ या आर्थिक वर्षात सार्वजनिक भांडवली खर्च वाढून ₹१२.२ लाख कोटी झाला.

केंद्रीय आर्थिक क्षेत्रांच्या (CPSEs) महत्त्वाच्या रिअल इस्टेट मालमत्तेच्या पुनर्वापराला गती देण्यासाठी समर्पित REIT ची स्थापना करण्यात आली. कर्जदारांना विवेकी दराने आंशिक क्रेडिट हमी देण्यासाठी पायाभूत सुविधा जोखीम हमी निधी देण्यात येणार आहे. प्रत्येक केंद्रीय आर्थिक क्षेत्रासाठी (CER) ५ वर्षांत ५,००० कोटी रुपयांचे वाटप होणार आहे. कोस्टल फ्रेट इन्सेंटिव्ह योजनेमुळे २०४७ पर्यंत अंतर्देशीय जलमार्ग आणि किनारी शिपिंगचा वाटा ६% वरून १२% पर्यंत वाढेल.

कार्यात्मक समर्थन देण्यासाठी सीप्लेन व्हीजीएफ योजना सुरू केली जाईल. पूर्वेकडील दानकुनी ते पश्चिमेकडील सुरत यांना जोडणारा नवीन समर्पित फ्रेट कॉरिडॉर होणार आहे . पुढील ५ वर्षांत २० नवीन राष्ट्रीय जलमार्ग होणार आहे. पर्यावरणास अनुकूल प्रवासी प्रणालींना प्रोत्साहन देण्यासाठी शहरांमध्ये 'वाढ कनेक्टर' म्हणून ७ हाय-स्पीड रेल्वे कॉरिडॉर सुरू करण्यात येणार आहे. प्रादेशिक उत्कृष्टता केंद्रे म्हणून प्रशिक्षण संस्था स्थापन केल्या जातील. गेल्या केंद्रीय अर्थसंकल्पात एकूण पायाभूत सुविधांवर खर्च अंदाजे ₹११.११ लाख कोटी इतका होता, जो भारताच्या जीडीपीच्या अंदाजे ३.४ टक्के इतका होता. रस्ते, रेल्वे, वाहतूक, लॉजिस्टिक्स आणि इतर पायाभूत सुविधा प्रकल्पांना बळकटी देण्यासाठी भांडवली खर्च म्हणून पायाभूत सुविधांसाठी हा पैसा वाटप करण्यात आला होता.

### 5 प्रादेशिक वैद्यकीय केंद्रांची घोषणा

■ सरकारने 5 प्रादेशिक वैद्यकीय केंद्रांची स्थापना करण्याची घोषणा केली आहे. ते वैद्यकीय प्रशिक्षण आणि संशोधन, वैद्यकीय सुविधांची उपलब्धता आणि आरोग्य क्षेत्रातील व्यक्तींसाठी विविध रोजगाराच्या संधी निर्माण करण्यावर लक्ष केंद्रित करतील.

■ सरकारने स्वावलंबी भारतासाठी आपली तिजोरी उघडली आहे. अर्थमंत्र्यांनी अर्थसंकल्पात यासाठी 2,000 कोटी रुपयांची घोषणा केली आहे. टियर 2 आणि टियर 3 शहरे विकसित केली जातील. 5 लाख किंवा त्याहून अधिक लोकसंख्या असलेली शहरे विकसित केली जातील.

■ केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारमण 2026 -27 या आर्थिक वर्षासाठी अर्थसंकल्प सादर करत आहेत. यावेळी त्यांनी अनेक महत्त्वाचे मुद्दे मांडले. अर्थमंत्र्यांनी सांगितले की, गुंतवणूक वाढवण्यासाठी त्या सतत प्रयत्नशील राहतील आणि भारताला निर्यात वाढवावी लागेल. एआयचा अधिक व्यापक वापर केला जाईल आणि प्रत्येक विभागावर विकासाचे लक्ष्य ठेवले जाईल. जागतिक अस्थिरतेच्या काळात विकासावर लक्ष केंद्रित करणे महत्त्वाचे आहे, असे त्यांनी सांगितले.

■ अर्थसंकल्प सादर करताना अर्थमंत्र्यांनी घोषणा केली की, केमिकल पार्क बांधले जातील, शहरांमध्ये नवीन आर्थिक क्षेत्रे निर्माण केली जातील आणि जीएसटी अधिक सुलभ केला जाईल.

■ 2026 -27 चा केंद्रीय अर्थसंकल्प सादर करताना अर्थमंत्री निर्मला सीतारमण म्हणाल्या, "आम्ही इंडिया सेमीकंडक्टर मिशन 2.0 सुरू करणार आहोत. नवीन तंत्रज्ञान उत्पादन प्रणालींमध्ये बदल घडत आहेत, तर पाणी, ऊर्जा आणि महत्त्वपूर्ण खनिजांची मागणी वेगाने वाढत आहे. भारत आत्मविश्वासाने विकसित भारताकडे वाटचाल करत राहील.

■ - अस्थिर जागतिक वातावरणात आर्थिक विकासाला गती देणे

■ - सामान्य लोकांच्या आकांक्षा पूर्ण करणे आणि त्यांना भारताच्या समृद्धीत भागीदार बनवण्यासाठी त्यांच्या क्षमता विकसित करणे

■ - प्रत्येक कुटुंब, धर्म आणि प्रदेशाला अर्थपूर्ण सहभागासाठी संसाधने, सुविधा आणि संधी उपलब्ध करून देणे.



### कस्टम ड्युटी सवलत आणि उद्योगांसाठी महत्त्वाचे निर्णय

■ केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारमण यांनी अर्थसंकल्पात अनेक कस्टम ड्युटी सवलत उपाययोजनांची घोषणा केली. सतरा कर्करोगविरोधी औषधांना मूलभूत कस्टम ड्युटीमधून सूट दिली जाईल, ज्यामुळे औषधे परवडणारी होतील. महत्त्वाच्या खनिजांसाठी भांडवली वस्तूंवरील मूलभूत कस्टम ड्युटी माफ केली जाईल, ज्यामुळे उद्योगांना उत्पादन आणि निर्यात करण्यास प्रोत्साहन मिळेल.

### करचुकवेगिरीसाठी फक्त दंड

■ आयकर विवरणपत्र खोटे लिहिणाऱ्यांवर आता दंड आकारला जाणार आहे. अर्थमंत्र्यांनी 30 टक्के कर जाहीर केला आहे. याचा अर्थ असा की, जे लोक त्यांचे उत्पन्न लपवतात त्यांच्यावर 30 टक्के कर आकारला जाईल.

■ अर्थमंत्र्यांनी सांगितले, "आम्हाला दुग्धव्यवसाय आणि कुक्कुटपालन बळकट करायचे आहे. आम्ही नवीन रोजगाराच्या संधी निर्माण करू शकतो. चंदन, नारळ आणि काजू चांगले उत्पन्न देतात. आम्हाला ईशान्य भागात बदाम आणि शेंगदाण्याला प्रोत्साहन द्यायचे आहेत."

■ भारत नारळाचा सर्वात मोठा उत्पादक आहे. 3 कोटी लोक त्यावर अवलंबून आहेत. आम्ही त्यांना मुख्य नारळ उत्पादक राज्यांमध्ये स्थापित करू. आम्ही काजू आणि कोकोला प्रोत्साहन देऊ. आम्ही यामध्ये स्वयंपूर्ण होऊ शकतो. आपण निर्यातीकडे वेगाने वाटचाल केली पाहिजे. चंदनाबद्दल बोलायचे झाले तर त्याचे सांस्कृतिक आणि सामाजिक महत्त्व आहे. चंदनाच्या लागवडीला चालना देणार आहोत.

### मानसिक आरोग्याबाबत अर्थमंत्र्यांची घोषणा

■ लखपती दीदींची योजना यशस्वी झाली. कर्ज-आधारित रोजगार वाढत आहेत. अपंग लोकांना सक्षम बनवण्याच्या आमच्या योजनेत विविध क्षेत्रांमध्ये संधी आहेत. आम्ही त्यांना शक्य तितक्या क्षेत्रात संधी देऊ. कृत्रिम अवयव निर्मितीसाठी एक संस्था स्थापन केली जाईल. मानसिक आरोग्याबाबत एक मोठी घोषणा करताना त्या म्हणाल्या की मानसिक आरोग्य संस्था स्थापन केल्या जातील.

### 7 नवीन हाय-स्पीड रेल्वे कॉरिडॉरची घोषणा

■ • मुंबई-पुणे • पुणे-हैदराबाद • हैदराबाद-चेन्नई

■ • हैदराबाद-बेंगळुरू • चेन्नई-बेंगळुरू • दिल्ली-वाराणसी

■ • वाराणसी-सिलीगुडी

■ केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारमण यांनी अर्थसंकल्पात दिल्ली-वाराणसी कॉरिडॉरसह सात हाय-स्पीड रेल्वे कॉरिडॉरची घोषणा केली. वाराणसी आणि पटना येथे जहाज दुरुस्ती सुविधा स्थापन केल्या जातील. दिल्ली-वाराणसी आणि वाराणसी-सिलीगुडी कॉरिडॉरमध्येही हाय-स्पीड रेल्वे कॉरिडॉर बांधले जातील.

### पंतप्रधान मोदींनी कौतुक केले

■ पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी अर्थसंकल्पाचे कौतुक केले आणि म्हटले की हा संधींचा महामार्ग आहे. तो सध्याच्या स्वप्नांना पूर्ण करतो. तो देशाच्या अर्थव्यवस्थेला बळकटी देईल आणि विकसित भारताचा पाया मजबूत करेल. भारताच्या सुधारणांना गती मिळेल. अर्थसंकल्पाने निर्मला सीतारामन यांनी अर्थमंत्री म्हणून एक विक्रम प्रस्थापित केला आहे, असे सांगून त्यांनी त्यांचे कौतुक केले.

■ अर्थमंत्र्यांच्या अर्थसंकल्पानंतर गृहमंत्री अमित शहा यांची पहिली प्रतिक्रिया आली. ते म्हणाले की, उत्पादन ते पायाभूत सुविधांपर्यंत, आरोग्य ते पर्यटन, ग्रामीण भाग ते एआय, क्रीडा ते तीर्थस्थळांपर्यंत, डेव्हलप इंडिया बजेट प्रत्येक गाव, शहर आणि शहरातील तरुण, महिला आणि शेतकऱ्यांचे स्वप्न पूर्ण करणारं बजेट आहे.

### शिक्षणाची गाडी सुस्साट...

■ 2026 च्या अर्थसंकल्पातील एक प्रमुख घोषणा म्हणजे देशभरातील पाच विद्यापीठ टाउनशिपचा विकास... या टाउनशिपमध्ये शिक्षण, संशोधन, वसतिगृहे, क्रीडा आणि स्टार्टअप्ससाठी एकच ठिकाणी अनेक सुविधा उपलब्ध केल्या जातील.

## विदर्भाच्या तोंडाला पाने पुसली : रमेशचंद्र बंग

▸विदर्भ केसरी। नागपूरः



भविष्याचा कोणताही ठोस वेध न घेता, महाराष्ट्र आणि विशेषतः विदर्भाच्या पदरात काहीही ठोस पडलेले नाही. विदर्भातील सिंचन प्रकल्प, रखडलेले रेल्वे मार्ग आणि शेतकऱ्यांच्या प्रश्नांवर या बजेटमध्ये कोणतीही विशेष तरतूद करण्यात आलेली नाही. नागपूर मेट्रोच्या नावाखाली केवळ घोषणांचा पाऊस पाडला जात आहे, पण सामान्य जनतेच्या खिशाला परवडणारे काहीही यात नाही. कापूस आणि सोयाबीन उत्पादक शेतकऱ्यांच्या मालाला रास्त भाव मिळावा, यासाठी कोणतीही हमी या सरकारने दिलेली नाही. स्वयंपाकाच्या गॅसपासून ते जीवनावश्यक वस्तूंच्या किमतींवर सरकारचे कोणतेही नियंत्रण नाही असा आरोप माजी मंत्री राष्ट्रवादी काँग्रेस शप गट रमेशचंद्र बंग यांनी केला.

■ **महाराष्ट्राच्या विकासाला गती देणारा अर्थसंकल्प -चंद्रशेखर बावनकुळे**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी सादर केलेला केंद्रीय अर्थसंकल्प महाराष्ट्राच्या विकासाला गती देणारा आणि भविष्योन्मुख असल्याची प्रतिक्रिया महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी दिली. रेल्वे, रस्ते, उद्योग, कृषी, आरोग्य, शिक्षण आणि महिला सक्षमीकरण अशा विविध क्षेत्रांसाठी करण्यात आलेल्या भरीव तरतुदींमुळे महाराष्ट्राच्या सर्वांगीण प्रगतीला नवी दिशा मिळणार आहे. राज्यातील रेल्वे प्रकल्पांसाठी मंजूर करण्यात आलेला २३,७७८ कोटींचा विक्रमी निधी, मुंबई–पुणे हायस्पीड रेल्वे कॉरिडॉर, तसेच अमृत भारत स्थानक योजनेअंतर्गत १३२ स्थानकांचा पुनर्विकास हे राज्याच्या पायाभूत सुविधांसाठी महत्त्वाचे ठरणार आहे. हा अर्थसंकल्प आत्मनिर्भर, समृद्ध आणि विकसित महाराष्ट्राच्या दिशेने टाकलेले ठोस पाऊल आहे.

■ **विकसित भारताकडे दमदार पाऊल - जयदीप कवाडे**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या 'विकसित भारत' या दीर्घकालीन संकल्पनेला मूर्त स्वरूप देणारा, देशाच्या सामाजिक व आर्थिक प्रगतीचा मार्ग स्पष्ट करणारा अर्थसंकल्प आहे, असे मत पीपल्स रिपब्लिकन पार्टी (पीरिपा) चे राष्ट्रीय कार्याध्यक्ष तसेच महाराष्ट्र लघुउद्योग विकास महामंडळाचेउपाध्यक्ष (राज्यमंत्री दर्जा) जयदीप कवाडे यांनी व्यक्त केले. कृषी पायाभूत सुविधा, प्रक्रिया उद्योग, साठवण व्यवस्था आणि बाजारपेठेच्या बळकटीकरणावर दिलेला भर शेतकऱ्यांना आत्मनिर्भर बनवण्याच्या दिशेने महत्त्वाचे पाऊल आहे. तसेच कौशल्य विकास, नवउद्योजकता आणि आधुनिक तंत्रज्ञानावर केंद्रित केलेल्या योजना देशातील तरुणांना रोजगारक्षम बनवतील. विकसित, आत्मनिर्भर आणि समृद्ध भारताच्या दिशेने टाकलेले हे ठोस पाऊल आहे.

■ **भविष्यवादी, संवेदनशील व महत्त्वाकांक्षी अर्थसंकल्प - आमदार डॉ आशिष देशमुख**

हा भारताच्या विकासाच्या दृष्टीने फ्युचरिस्टिक (भविष्यवादी), संवेदनशील व महत्त्वाकांक्षी अर्थसंकल्प असून ग्रामीण क्षेत्र, महिला सशक्तिकरण, होतकरू युवक व शेतकऱ्यांच्या कल्याणासाठी आणलेला ऐतिहासिक असा अर्थसंकल्प आहे. हा अर्थसंकल्प म्हणजे सशक्त व विकसित भारतासाठी मजबूत अर्थव्यवस्थेचे द्वार असल्याचे भाजप आमदार डॉ आशिष देशमुख यांनी म्हटले आहे.शेती व्यवसाय, डेअरी, मत्स्यपालन, पशुपालन व्यवसायाला प्राथमिकता, मेडिकल हब, पर्यटन, खेलो इंडिया, टॅक्समध्ये सूट, सेमीकंडक्टर, टेक्स्टाईल सेक्टर, हायटेक टूल्स, इन्फ्रास्ट्रक्चर मजबुती, शहरी विकासावर भर यामुळे हे बजेट विकसित भारताची गती वाढवणार आहे.

## महाराष्ट्राला मिळणार सुमारे 1 लाख कोटी !

### विकसित भारताकडे दमदार पाऊल : मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

▸विदर्भ केसरी। मुंबई



पंतप्रधान नरेंद्र मोदीजी यांच्या नेतृत्वात केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी मांडलेला अर्थसंकल्प हा विकसित भारताकडे दमदार वाटचाल करणारा आहे. केंद्रीय करातून महाराष्ट्राला मिळणारा वाटा हा 98,306 कोटी रुपये इतका असणार आहे. याशिवाय अर्थसंकल्पाचे प्राथमिक आकलन करता, 12,355 कोटी विविध प्रकल्पांसाठी आहेत. त्यामुळे सुमारे 1 लाख कोटी महाराष्ट्राला मिळतील, असे मुख्यमंत्री श्री देवेंद्र फडणवीस यांनी आज सांगितले.

केंद्रीय अर्थसंकल्पावर प्रतिक्रिया देताना माध्यमांशी ते बोलत होते. शहरीकरणाला नियोजनबद्ध करुन, उद्योग आणि उद्योजकतेला प्रोत्साहन देऊन, गुंतवणूक आणि रोजगार निर्मितीसाठी खंबीर उपाययोजना या अर्थसंकल्पातून करण्यात आल्या आहेत. पायाभूत सुविधा क्षेत्रात 12 लाख कोटींची गुंतवणूक सरकार करणार आहे, पूर्वी जी केवळ 1 लाख कोटी असायची. 5 लाख लोकसंख्या असलेल्या शहरातील विकासाचा विचार करुन शहरीकरणाच्या एकात्मिक विचार करण्यात आला आहे. यातून विविध क्षेत्रांना दिशा, गती आणि निधी प्राप्त होणार आहे. याचा मोठा लाभ महाराष्ट्राला होणार आहे. शेती, पशुपालन, मत्स्यव्यवसाय आणि सिंचन यासाठी भरीव तरतुदी करण्यात आल्या आहेत. लखपती दिदी योजनेच्या यशानंतर महिलांसाठी स्वतंत्र मॉल्स आणि उद्योगांच्या संधी तयार करण्याची योजना अत्यंत महत्त्वाची आहे. प्रत्येक जिल्ह्यात उच्च शिक्षण घेणाऱ्या मुलींसाठी वसतीगृहांची योजना तयार करण्यात आली आहे. जिल्हा रुग्णालयात आपात चिकित्सा व्यवस्था उभी करण्याचा निर्णय आरोग्य क्षेत्रात मोलाचा ठरेल. मुंबई-पुणे, पुणे-हैदराबाद हायस्पीड कॉरिडॉरमुळे जीडीपीत मोठी वाढ होईल. पुणे-हैदराबाद कॉरिडॉरचा मराठवाडा, पश्चिम महाराष्ट्राला मोठा लाभ होईल. ग्रोथहबसाठी 5000 कोटी प्रत्येकी 5 वर्षांत प्राप्त होणार आहेत, याचा लाभ मुंबई महानगर (एमएमआर), पुणे महानगर, नागपूर महानगर ग्रोथहबला होणार आहे, असेही देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले.

### महाराष्ट्रासाठी काय?

- ■ महाराष्ट्र ग्रामीण रस्ते प्रकल्प : 378.38 कोटी
- महाराष्ट्र अॅग्रीबिझनेस प्रकल्प : 167.28 कोटी
- सर्वसमावेशक विकासासाठी इकॉनॉमिक क्लस्टर : 283.77 कोटी
- महाराष्ट्र टर्शरी केअर आणि वैद्यकीय शिक्षण विकास कार्यक्रम : 385.78 कोटी
- उपसा सिंचन योजनांचे सौर ऊर्जीकरण : 207.10 कोटी
- शेती आणि ग्रामीण परिवर्तन प्रकल्प : 646.24 कोटी
- मानवी विकासासाठी कौशल्य आणि अप्लाईड नॉलेज प्रकल्प : 313.65 कोटी
- - जिल्ह्यांमध्ये संस्थात्मक संरचना क्षमतावृद्धीसाठी : 240.90 कोटी
- - मुंबई-अहमदाबाद हायस्पीड कॉरिडॉर : 6103 कोटी
- - मुंबई मेट्रो : 1702 कोटी
- - एमयुटीपी 3 : 462 कोटी
- - एमएमआरमध्ये ग्रीन मोबिलिटी : 155.32 कोटी
- - समृद्धी महामार्गावर आयटीएस : 680.79 कोटी
- - पुणे मेट्रो : 517.74 कोटी

(ही केवळ मुंबई, पुण्यातील प्राथमिक आकडेवारी आहे. एकूण : 12,355 कोटी)

दैनिक
**विदर्भ केसरी**
विदर्भाचा मानबिंदू
सोमवार, २ फेब्रुवारी २०२६ | २

# परिवहन विभाग 'ऑनफिल्ड'!

## जिल्ह्यात खासगी बस तपासणी मोहीम सुरू : आरटीओकडून ४८ खासगी बसेसवर नियमानुसार कारवाई

**विदर्भ केसरी। मनीष शिरभाते**

**यवतमाळ : जिल्ह्यात नुकत्याच घडलेल्या खासगी बस आगीच्या घटनेनंतर प्रवासी सुरक्षिततेच्या अनुषंगाने परिवहन विभागाने दक्षता घेत जिल्हाभर खासगी बस तपासणी मोहीम सुरू केली आहे. उपप्रादेशिक परिवहन अधिकारी कार्यालयाकडून जिल्ह्यातील वायुवेग पथके व परिवहन निरीक्षकांना याबाबत लेखी निर्देश देण्यात आले असून त्यानुसार ही कारवाई राबविण्यात येत आहे.**

उपप्रादेशिक परिवहन अधिकारी प्रशांत देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली पुसद, दारव्हा, उमरखेड, वणी, दिग्रस आदी तालुक्यांमध्ये वायुवेग पथके व परिवहन निरीक्षकांची नियुक्ती करण्यात आली आहे. या पथकांकडून खासगी प्रवासी बसांची तपासणी करण्यात येत असून आतापर्यंत ४८ खासगी बसेसवर मोटार वाहन कायदा व संबंधित नियमांनुसार कारवाई करण्यात आल्याची माहिती देण्यात आली आहे.

**विदर्भ केसरीचा फॉलोअप | विदर्भ केसरी | भाग १**




■ या संदर्भातील वृत्त 'विदर्भ केसरी'मध्ये प्रसिद्ध झाल्यानंतर परिवहन विभागाने तातडीने दखल घेत तपासणी मोहीम अधिक व्यापक स्वरूपात राबविण्यास सुरुवात केली असून ही कारवाई पूर्णतः प्रवाशांच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने असल्याचे अधिकाऱ्यांकडून स्पष्ट करण्यात आले आहे.

### तपासणीदरम्यान खालील बाबींची पडताळणी

■ * बसमध्ये मान्यताप्राप्त व कार्यक्षम अग्निशामक यंत्र उपलब्ध आहे की नाही * वाहनाचे फिटनेस प्रमाणपत्र वैध आहे का
* वाहनाचा विमा कालबाह्य झालेला नाही ना
* आपत्कालीन दरवाजा सुस्थितीत व वापरासाठी उपलब्ध आहे का
* टप्पा वाहतूक परवाना वैध आहे का
* वाहनामध्ये क्षमतेपेक्षा जास्त प्रवासी वाहतूक होत आहे का
* प्रवाशांकडून निर्धारित दरापेक्षा जास्त भाडे आकारले जात आहे का
* चालकाकडे वैध चालक परवाना आहे का
* इतर आवश्यक कागदपत्रे व नियमांचे पालन होत आहे का

■ याबाबत माहिती देताना उपप्रादेशिक परिवहन अधिकारी प्रशांत देशमुख यांनी सांगितले की, "प्रवाशांच्या सुरक्षिततेला सर्वोच्च प्राधान्य देण्यात येत आहे. ही तपासणी मोहीम सातत्याने सुरू राहणार असून नियमांचे उल्लंघन आढळल्यास संबंधित वाहन चालक व मालकांवर कायद्यानुसार कारवाई केली जाईल."

■ आरटीओकडून सुरू असलेल्या या तपासणी मोहिमेमुळे खासगी बस चालक व मालकांमध्ये सतर्कता निर्माण झाली असून प्रवासी वर्गाकडून या कारवाईचे सकारात्मक स्वागत करण्यात येत आहे. सार्वजनिक वाहतुकीतील सुरक्षितता सुनिश्चित करण्यासाठी ही मोहीम उपयुक्त ठरत असल्याचे नागरिकांकडून व्यक्त करण्यात येत आहे.

## अग्रलेख

# कधीही ब्रेक नसतो

राजकारण हे काळासारखे असते. काळ कोणासाठी कधी थांबत नाही असे म्हणतात. राजकारणही तसेच असते. ते कोणासाठी कधी थांबत नाही. 'याल तर बरोबर, नाही तर तुम्हाला सोडून, तुमच्याशिवाय' असा खाक्या असलेले राजकारणही कधी थांबत नाही. ते काळासारखे पुढेच जात असते. त्यामुळे, राजकारणात वावरणाèया प्रत्येकाला एक गोष्ट कायम लक्षात ठेवावी लागते. राजकारणाचे बोट धरून पुढे चालायचे आणि ते बोट सुटू द्यायचे नाही, याचे भान प्रत्येकास जपावे लागते. एकदा ते बोट सुटले, की त्याला पुन्हा पुढे जाऊन राजकारण गाठता येत नाही. म्हणूनच, राजकारण अनाकलनीय असते, असेही म्हणतात. त्याला संवेदना नसतात, असेही दिसून येते. त्याच्याविषयी अनेक प्रवाद, चर्चा, समजुती, अफवा वगैरे आहेतच! थोडक्यात, राजकारण हे हत्ती आणि चार आंधळे या गोष्टीसारखे असते. राजकारणाबाबत ज्याचा जसा अनुभव, तसे ते त्यास दिसते आणि ते तसेच असते असा त्याचा ठाम विश्वास असतो. काहींना ते वाळूसारखे दिसते. ही वाळू मुठीत पकडली, तरी निसटून जाण्याचा प्रयत्न करत असते. काहींना ते पायाखालच्या वाळूसारखे भासते. त्यावर स्थिर उभे राहणे ही मोठी कसरत असते. पायाखालची वाळू सरकू नये यासाठी ती कसरत करणे भागच पडते, तसेच राजकारणातही करावे लागते. काहींना राजकारण म्हणजे घोडेस्वारी वाटते. घोड्यावर पक्की मांड ठोकता आली नाही, तर अवखळ घोडा पाठीवरल्या स्वाराला झुगारून देतो आणि स्वैर उधळतो. तसेच राजकारणात ज्याला पक्की मांड ठोकता आली नाही, तो जायबंदीदेखील होऊ शकतो. काहींच्या बाबतीत, राजकारण म्हणजे अळवावरच्या पाण्यासारखे असते. समोर असेपर्यंत अळवावरच्या पाण्याचा थेंब मोत्यासारखा चकाकत भुरळ घालतो, म्हणून तो बोटात पकडण्याचा मोह अनावर होऊन हात घालावा, तर अचानक गळून जमिनीवर पडतो व बघता बघता मातीत मुरूनही जातो. काहींच्या बाबतीत राजकारण हे सट्ट्यासारखे असते. नशिबाने साथ दिली, तर अचानक लॉटरी लागते आणि बघता बघता रंकाचा राव होऊन जातो, तर अनेक जण रावाचे रंकदेखील होऊन जातात. सट्ट्याचा नाद वाईट असतो. त्यामध्ये हार पत्करावी लागली, तर जिद्द जागी होते आणि गमावलेले सारे काही पुन्हा मिळविण्याच्या ईर्ष्येने पुन्हा पुन्हा आपले डाव नव्याने खेळताना आणखीनच काही गमावण्याचीही वेळ येते. जवळचे सारे काही संपल्यानंतरही, सट्टा खेळण्याचे व्यसन स्वस्थ बसू देत नाही. राजकारणातही तसे काही जण दिसतात. काहींना वारसा मिळूनदेखील नशीब साथ देत नाही, तर काहींना मिळालेल्या वारशाची पुण्याई फळाला येत नाही. काही जण या पुण्याईचे तुणतुणे वाजवत राजकारणाच्या वेगासोबत पळण्याचा प्रयत्न करतात आणि काही जणांना दमछाक होऊनही पळणे थांबविताच येत नाही. काही जण ही स्पर्धा मध्येच सोडून देतात, तर काही जणांना राजकारणच स्पर्धेतून बाद करून टाकते. असे कितीतरी जण राजकारणाच्या स्पर्धेतून बाद होऊन गेले आहेत. राजकारणाचा हा हत्ती आपल्या चालीने पुढेच जात असतो, म्हणूनच ते अनेकांना अनाकलनीय वाटत असते. काळ पुढे सरकतो, तसे राजकारणही पुढे सरकत असले, तरी ते घड्याळासारखे असते. घड्याळाचे काटे पुढे सरकत असले, तरी फिरून प्रत्येक ठरावीक काळानंतर तीच वेळ पुन्हा दाखवतात. म्हणून घड्याळाचे काटे मागे फिरवता येत नसतानाही, कालची वेळ पुन्हा येऊ शकते, हे राजकारणाचे वैशिष्ट्य असते. या प्रत्येक अनुभवातून राजकारणात उतरलेला कोणी ना कोणी सातत्याने जातच असतो. गेल्या काही दशकांतील देशाच्या आणि महाराष्ट्राच्या राजकारणाचे हे सारे रंग अनुभवले आहेत. शोभादर्शक जितक्या वेळा फिरवावा, तेवढ्या वेळा त्यामध्ये आकर्षक चित्ररंग दिसतात. प्रत्येक चित्र नवे, पहिल्याहून वेगळे असते. पण कधीतरी मात्र, एखादे अगोदरचे चित्र पुन्हा उमटते. तसे क्वचितच होत असले, तरी तसे होते. राजकारणातही तसे दिसते. एखादे चित्र नव्याने पाहत असल्यासारखे वाटत असले, तरी तीच चित्रे अगोदर कधीतरी दिसलेली असतात. असा अनुभव प्रत्यक्षातही कधीतरी येतो. एखादी घटना डोळ्यांसमोर घडते, तेव्हा तशीच घटना पूर्वी कधीतरी, प्रत्यक्षात किंवा ऐकिवात घडल्याची जाणीव होते आणि हे सारे आपण अनुभवलेले आहे, हेही जाणवते. गेल्या काही दिवसांत राजकारणात घडत गेलेल्या घडामोडी पाहता, असेच काहीसे अनुभवास येऊ लागले आहे. ते अनाकलनीय असले, तरी तसे घडणे नवे नाही. राजकारण कोणासाठी थांबत नसले, तरी एखाद्याचे बोट सुटल्यानंतर दुसरे कोणीतरी ते बोट पकडून राजकारणासोबत पुढे चालत राहतो. राजकारणाच्या अलिकडच्या इतिहासात तसे अनेकदा घडले आहे. काही वेळा, राजकारणाचे बोट रिकामे राहू नये यासाठी त्यासोबत धावणारे अनेक जण अन्य कोणास बरोबर घेतात आणि सामुदायिकरीत्या राजकारणासोबत पुढची वाटचाल सुरू होते. नव्याने राजकारणाचे बोट धरणारा कधीतरी पुढच्या वाटचालीत अडखळतो. त्याला अशा वाटचालीची सवयही नसते. तो भांबावतो. तसे होणे अनपेक्षित नसते. उलट, तसाच नवखा कोणी पुढच्या वाटचालीत सोबत आला, तर अनेकांस आनंदही होतो. तो अर्ध्यावर बोट सोडेल, थकेल, पुढची वाट चालण्याआधीच थांबेल आणि पुन्हा कोणी नवखा नवे बोट पकडून सोबत येईल, अशा अपेक्षेने पुढची वाटचाल सुरू होते. प्रत्यक्षात मात्र, राजकारणाच्या पुढच्या चालीमध्ये असे सहसा होत नाही. एखादे बोट सुटलेच, तर ते बोट पकडून पुढे वाटचाल करणारा गडी नव्या दमाचा असेल, तर त्याची वाटचाल अधिक दमदारही होते आणि ज्या अपेक्षेने त्याला सोबत घेण्याची धडपड होते, तोच धोबीपछाडही देतो, याची जाणीव ठेवावी लागते. गेल्या काही दशकांत असे घडले आहे. हा इतिहास फार जुना नाही. तो विस्मरणातही गेलेला नाही.



# २१२१ गजानन भक्तांनी केले सामूहिक पारायण

**विदर्भ केसरी। तळेगाव (श्या.पं**

येथील मराठा शिक्षण संस्थेच्या लेफ्टनंट जनरल राजेंद्र निंभोरकर सैनिक शाळेमध्ये संस्थेच्या वतीने परिसरातील शेतकरी, पालक, विद्यार्थी व नागरिकांकरिता २९ रोजी श्री गजानन विजय ग्रंथाचे सामूहिक पारायणाचे आयोजन केले होते.

विद्यार्थ्यांचा नैतिक व आध्यात्मिक विकास व्हावा, या हेतूने या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या पारायण सोहळ्याला २१२१ भाविकांची उपस्थिती होती. परिसरातील सर्व लहान-मोठ्या गावातील गजानन महाराज भत मंडळींनी सकाळी ६.३० वाजता हजेरी लावली होती. सायंकाळी ६ वाजेपर्यंत हा सोहळा सुरू होता. या सोहळ्या दरम्यान २१ अध्यायांचे पारायण करण्यात आले. पारायण आटोपल्यानंतर सर्व भाविकांना फराळ व प्रसाद वितरित करण्यात आले. पारायण सोहळ्याचे आयोजन संस्थेचे अध्यक्ष दिलीप निंभोरकर यांनी केले होते.

# २९०० किमीचा थरारक पाठलाग!

## ऑपरेशन प्रहारअंतर्गत चार सराईत गुन्हेगार पोलिसांच्या जाळ्यात.

**विदर्भ केसरी। मुर्तिजापूर प्रतिनिधी.**



मुर्तिजापूर ग्रामीण पोलिसांनी 'ऑपरेशन प्रहार' अंतर्गत एका मोठ्या कारवाईत, तब्बल २९०० किलोमीटरचा पाठलाग करून खुनी हल्ल्यातील चार फरार आरोपींना बेड्या ठोकल्या आहेत. ही कारवाई अकोला जिल्हा पोलीस अधीक्षक अर्चित चांडक यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली. दिनांक ११ जानेवारी २०२६ रोजी शेलू वेताळ येथील यात्रेत जुन्या वादातून फिर्यादी समीर गंगाधर जाधव यांचा मित्र आशिष देशमुख याच्यावर आरोपींनी प्राणघातक हल्ला केला होता. आरोपींनी दगड आणि चाकूने वार करून आशिषला गंभीर जखमी केले होते. याप्रकरणी मुर्तिजापूर ग्रामीण पोलीस ठाण्यात भा.न्या.सं. कलम ११८(१), ११८(२), ११५, ३५१(२), ३५२, ३(५) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला होता. पाच जिल्ह्यांत २९०० किमीचा पाठलाग गुन्हा घडल्यापासून आरोपी फरार होते आणि वारंवार आपले ठिकाण बदलत होते. त्यांचा शोध घेण्यासाठी तीन विशेष पथके तयार करण्यात आली होती. सायबर सेल आणि तांत्रिक मदतीच्या आधारे पोलिसांनी अमरावती, बडनेरा, नागपूर, ठाणे, बृहन्मुंबई, कल्याण आणि पुणे अशा मोठ्या शहरांमध्ये आरोपींचा मागोवा घेतला. सीसीटीव्ही फुटेज आणि गोपनीय बातमीदारांच्या मदतीने, रेल्वे स्टेशन, बस स्टँड आणि धार्मिक स्थळांची तपासणी करत पोलिसांनी अखेर आरोपींना मोठ्या शिताफीने अटक केली. अटक करण्यात आलेले आरोपी.

१. मीर मुसैब हुसेन मेहंदी हुसेन १९ वर्षे, रा. मुर्तिजापूर
२. सुजल उमेश जाधव २० वर्षे, रा. मुर्तिजापूर
३. प्रतिक गौतम खंडारे १९ वर्षे, रा. मुर्तिजापूर
४. सुमित महादेव शिरेकर १९ वर्षे, रा. कंझरा, ता. मुर्तिजापूर

पोलीस पथकाचे यश

ही यशस्वी कामगिरी पोलीस अधीक्षक अर्चित चांडक, अपर पोलीस अधीक्षक बी. चंद्रकांत रेड्डी, उपविभागीय पोलीस अधिकारी वैशाली मुळे यांच्या मार्गदर्शनाखाली मुर्तिजापूर ग्रामीणचे ठाणेदार श्रीधर जी. गुड्डे, , पोउपनि चंदन वानखडे ,एक एस आय दिपक कानडे,पोहेकॉ ज्ञानेश्वर रडके,मनिष मालठाणे,शंकर खेडकर, रितेश मददी, गजानन सयाम,सायबर सेलचे पोहेकॉ गोपाल ठोंबरे, गणेश कुहिले त्यांच्या पथकाने कामगिरी बजावली.

# नाकर्तेपणावर चमत्कार करण्याची वेळ

## महामार्ग अधिकाऱ्यांच्या हस्ते 'अघोरी पूजेचे' घाट

**विदर्भ केसरी। यवतमाळ**

नागपूर-तुळजापूर या भव्य-दिव्य महामार्गावर हिवरा (संगम) फाट्याजवळ होणारे मृत्यू रोखण्यात रस्ते विकास यंत्रणा अपयशी ठरली आहे. वारंवार विनंत्या करूनही प्रशासनाचे डोळे उघडत नसल्याने, आता संतापलेल्या ग्रामस्थांनी चक्क 'अघोरी' मार्गाचा अवलंब करण्याचा पवित्रा घेतला आहे. हिवरा येथील त्रस्त नागरिक हरीश भिमराव कामारकर यांनी थेट अंधश्रद्धा निर्मूलन समितीच्या (ANIS) राज्य अध्यक्षांना ई-मेल द्वारे पत्र लिहून, महामार्ग प्राधिकरणाच्या अधिकाऱ्यांच्या हस्ते 'अपघाती भुताचा' बंदोबस्त करण्यासाठी अघोरी पूजा करण्याची परवानगी मागितली आहे. प्रशासकीय ढिसाळपणावर ओढलेला हा जळजळीत उपरोधिक कोरडा सध्या चर्चेचा विषय ठरला आहे. हिवरा (संगम) ता. महागाव जि. यवतमाळ येथील एकविरा देवीच्या बोर्डाजवळ महामार्ग आणि गावचा रस्ता एकत्र येतो. या ठिकाणी बायपास मंजूर असूनही त्याचे काम रखडलेले आहे, परिणामी येथे अपघातांचे सत्र सुरू असून अनेक निष्पाप जीवांचा बळी गेला आहे. "येथे इतके अपघात झाले आहेत की गावाला आता रक्ताचे सडे पाहण्याची सवय झाली आहे," अशी आर्त हाक कामारकर यांनी पत्रातून दिली आहे. मात्र, इतके बळी जाऊनही अधिकारी ढिम्म हलत नसल्याने, या जागेवर एखाद्या अतिशय ताकदवान 'भुताचा' वास असावा आणि त्या भुताने संपूर्ण प्रशासकीय यंत्रणेला 'संमोहित' करून त्यांचे डोळे पांढरे केले असावेत, अशी खात्री गावकऱ्यांची पटली असल्याचा टोला या पत्रात लगावण्यात आला आहे. विशेष म्हणजे, ही बाधा दूर करण्यासाठी कामारकर यांनी १६ फेब्रुवारी रोजीच्या सोमवती अमावस्येचा मुहूर्त काढला आहे. सायंकाळी ५:३४ वाजता मांत्रिकाच्या मदतीने जाहीर पूजा-अर्चा आणि लिंबू-उतारा करण्याचे नियोजन त्यांनी केले आहे. महत्त्वाची बाब म्हणजे, प्रशासकीय अधिकाऱ्यांच्या अंगात आलेली 'आळसाची बाधा' उतरावी यासाठी ही संपूर्ण पूजा महामार्ग प्राधिकरणाच्या जबाबदार अधिकाऱ्यांच्या हस्तेच पार पाडण्याचा मानस त्यांनी व्यक्त केला आहे. अधिकाऱ्यांच्या हातातील रखडलेल्या फाईल्सवरून लिंबू ओवाळले तरच कदाचित त्यांच्यातील संवेदना जागृत होतील, असा उपरोधिक चिमटाही त्यांनी काढला आहे. अंधश्रद्धा निर्मूलन समितीकडे अशी अघोरी मागणी करणे हा एकप्रकारे प्रशासनाच्या नाकर्तेपणाचा जाहीर निषेध मानला जात आहे. "जेव्हा जिवंत प्रशासकीय यंत्रणाच लोकांचे बळी घेऊ लागते, तेव्हा आम्हाला हा 'चमत्कार' करण्याची परवानगी मिळावी," असे या पत्रात शेवटी म्हटले आहे. या पत्राच्या प्रती माहितीसाठी नागपूर आणि यवतमाळ येथील महामार्ग प्राधिकरणाच्या अधिकारयांनाही पाठवण्यात आल्या आहेत. आता या 'अघोरी' पत्राची दखल घेऊन प्रशासन बायपासचे काम मार्गी लावते की, १६ फेब्रुवारीला खरोखरच अधिकाऱ्यांच्या हस्ते पूजेची वेळ येते, याकडे संपूर्ण जिल्ह्याचे लक्ष लागले आहे.

# अनसिंगमध्ये संत रोहिदास महाराज जयंतीचा उत्साह; भव्य रॅलीने अवघे गाव दुमदुमले

**विदर्भ केसरी।अनसिंग**

येथील संत शिरोमणी रोहिदास महाराज यांच्या ६४९ व्या जयंतीनिमित्त रविवारी, १ फेब्रुवारी रोजी गावात भव्य मिरवणूक काढण्यात आली. 'संत रोहिदास महाराज की जय' अशा जयघोषाने आणि ढोल-ताशांच्या गजराने संपूर्ण अनसिंग परिसर भक्तिमय झाला होता.



■ **पारंपारिक उत्साहात रॅली**

स काळी स्थानिक संत रोहिदास मंदिर परिसरात महाराजांच्या प्रतिमेचे पूजन मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. त्यानंतर मुख्य बाजारपेठेतून भव्य रॅलीला सुरुवात झाली. या रॅलीमध्ये सहभागी झालेल्या महिलांनी पारंपारिक वेशभूषा केली होती, तर तरुणांचे लेझीम पथक आकर्षणाचे केंद्र ठरले. गावातील प्रमुख मार्गांवर ग्रामस्थांनी रांगोळ्या काढून आणि पुष्पवृष्टी करून मिरवणुकीचे स्वागत केले.

सामाजिक समतेचा संदेश

यावेळी चर्मकार समाजातील बांधवांसह स र्वधर्मीय नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थिती लावली. संत रोहिदास महाराजांनी दिलेला 'मानवता आणि समतेचा' संदेश रॅलीच्या माध्यमातून जनसामान्यांपर्यंत पोहोचवण्यात आला. ठिकठिकाणी पिण्याच्या पाण्याची व अल्पोपहाराची व्यवस्था करण्यात आली होती.

■ **प्रशासकीय बंदोबस्त**

रॅलीदरम्यान कोणताही अनुचित प्रकार घडू नये, यासाठी स्थानिक पोलिसांनी चोख बंदोबस्त ठेवला होता. रॅलीच्या यशस्वीतेसाठी जयंती उत्सव समितीच्या पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी अतोनात परिश्रम घेतले. सायंकाळी महाप्रसादाने कार्यक्रमाची सांगता करण्यात आली.

# 'प्रश्न जिथे जनतेचा मार्ग, तिथे मनसेचा!'

## – अश्विन ठाकरे यांच्या संघर्षामुळे ग्रामपंचायतीची झोप उडाली

**विदर्भ केसरी। पांढरकवडा**

'प्रश्न जिथे जनतेचा मार्ग, तिथे मनसेचा' हे मनसेचे ब्रीदवाक्य केवळ घोषणापुरते न ठेवता प्रत्यक्ष कृतीत उतरवून दाखवण्याचे काम मनसेचे तालुकाध्यक्ष अश्विन ठाकरे सातत्याने करत आहेत. कुठलीही निवडणूक डोळ्यासमोर न ठेवता, गेल्या दोन वर्षांपासून ते नागरिकांच्या प्रश्नांसाठी थेट मैदानात उतरले आहेत.

गेल्या सहा महिन्यांपासून गावातील मुख्य रस्त्याच्या मधोमध जाणाऱ्या नालीवरील रपट्याच्या कामासाठी अश्विन ठाकरे ग्रामपंचायतीकडे सातत्याने पाठपुरावा करत आहेत. मात्र, वारंवार लेखी निवेदने देऊनही ग्रामपंचायतीकडून जाणीवपूर्वक दुर्लक्ष केले जात असल्याचा गंभीर आरोप त्यांनी केला आहे. रस्त्यावरील ही नाली अपघाताला आमंत्रण देणारी असून नागरिकांच्या रोजच्या जीवाशी खेळ सुरू आहे, तरीही प्रशासन आणि ग्रामपंचायत ढिम्म असल्याचे चित्र आहे.

अश्विन ठाकरे यांनी केवळ या प्रश्नापुरते मर्यादित न राहता मागील दोन वर्षांत गाव व तालुक्यातील विविध समस्या प्रशासनासमोर ठामपणे मांडल्या आहेत. संबंधित विभाग प्रश्न सोडवत नाही तोपर्यंत पाठपुरावा सुरूच ठेवण्याची त्यांची भूमिका आहे. अलीकडेच जिल्हा परिषद शाळेतील गंभीर समस्यांबाबत त्यांनी प्रशासनाकडे निवेदन देत तक्रार केली. त्याची दखल घेत शाळेच्या सुविधांमध्ये सुधारणा करण्यात आली.

विशेष म्हणजे, आपण ज्या शाळेत शिक्षण घेतले त्या शाळेला काही तरी देणं लागतो या भावनेतून अश्विन ठाकरे यांनी स्वतःहून शाळेच्या रंगरंगोटीच्या कामात आर्थिक मदत केली. या सामाजिक योगदानाची दखल घेत २६ जानेवारी रोजी झालेल्या सांस्कृतिक कार्यक्रमात शाळेतील शिक्षक, शिक्षिका, शाळा समिती व अध्यक्षांच्या हस्ते त्यांचा जाहीर सत्कार करण्यात आला.

या सर्व कामामुळे गावातच नव्हे तर संपूर्ण तालुक्यात अश्विन ठाकरे यांचे कौतुक होत आहे. मात्र, इतक्या वेळा निवेदने देऊनही नालीवरील रपटा का होत नाही? ग्रामपंचायत मुद्दाम दुर्लक्ष करत आहे का? असे प्रश्न आता उघडपणे उपस्थित होत आहेत.

जर लवकरच रपट्याचे काम सुरू झाले नाही, तर 'मनसे स्टाईल' आंदोलन पाहायला मिळणार का, याची उत्सुकता नागरिकांमध्ये आहे. एकूणच जनतेच्या प्रश्नांसाठी आक्रमकपणे उभे राहणारे अश्विन ठाकरे 'प्रश्न जिथे जनतेचा मार्ग, तिथे मनसेचा' हे वाक्य पुन्हा एकदा खरे ठरवत असल्याचे चित्र दिसत आहे.



दैनिक विदर्भ केसरी RNI MAHMAR/2022/88796 हे वृत्तपत्र प्रकाशक अमोल नरेश कंटाळे यांच्याव्दारे दैनिक विदर्भ केसरी कार्यालय शमीम आझाद शाळा दर्यापूर. जि. अमरावती कार्यालय, येथून मालक अमोल नरेश कंटाळे यांच्या वतीने प्रकाशित केलेले असून संपादक अमोल कंटाळे यांनी संपादीत केलेले आहे. आणि मुद्रक साई दर्पण प्रकाशन यांनी सिव्हिल लाइन दर्यापूर ता. दर्यापूर जिल्हा अमरावती पिन 444803 येथे मुद्रीत केलेले आहे. (या वृत्तपत्रातील प्रकाशित झालेल्या जाहीरातीसंदर्भात त्या त्या कार्यालयाशी / संस्थेची व्यक्तीशः संपर्क साधुन खात्री करुन पुढील व्यवहार करावा. वृत्तपत्रात प्रसिद्ध झालेल्या लेख, वृत्त किंवा इतर मजकुराशी संपादक सहमत असतीलच असे नाही. (काही वाद निर्माण झाल्यास दर्यापूर न्यायालया अंतर्गत)

Printed by-Amol Naresh kantale (printer name) and published by- Amol Naresh kantale (Owner name) and printed at-SAI DARPAN PRAKASHAN civil line, Daryapur Tq-Daryapur dist, Amravati Maharashtra 444803 (name & complete address of printing press)and published at-shamim Azad school Rajputpura, Daryapur, dist, Amravati, Maharashtara-444803 complete place of publication-Editor-Amol Naresh Kantale(Editor name ) tital code. MAHMAR51049 l, Email:-vidarbhkesari21@gmail.com Mob-9975532291,9096945629

## मुक्त विद्यापीठाच्या परीक्षा सुरळीत

पुसद, यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाच्या हिवाळी परीक्षा अमरावती विभागात शांत, शिस्तबद्ध व विद्यापीठाच्या नियमांनुसार सुरळीत सुरू आहेत. अकोला, अमरावती, वाशीम, बुलढाणा व यवतमाळ या पाच जिल्ह्यांतील एकूण 34 परीक्षा केंद्रांचा समावेश असून जिल्ह्यात 10 परीक्षा केंद्रावर परीक्षा होत असून पुसद येथील वत्सलाबाई नाईक महिला महाविद्यालयात 574 तर गुणवंतराव देशमुख महाविद्यालयात 285 विद्यार्थी परीक्षा देत आहेत बी. ए., बी. कॉम., बी. एससी., एम. ए., एम. कॉम., एम. एससी., बी. लिब., शिक्षणशास्त्र, पत्रकारिता अभ्यासक्रमांसाठी नवीन शैक्षणिक धोरणानुसार सत्र पद्धतीतील तसेच पुनःपरीक्षार्थी मिळून एकूण 21,405 विद्यार्थी परीक्षा देत आहेत.

### महत्त्वाचे



## स्व. अजित दादा पवार यांना ग्रा पं कोपरा बुद्रुक शोकसभेत मध्ये श्रद्धांजली

**▸विदर्भ केसरी। पुसद प्रतिनिधी विजय निखाते**

महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री तथा लोकनेते अजित दादा पवार यांचे विमान अपघातात दुःखद निधन झाले. त्यांच्या निधनाच्या पार्श्वभूमीवर शोक सभा / श्रद्धांजली वाहण्याकरिता ग्रामपंचायत कार्यालय कोपरा बुद्रुक येथे अजितदादा पवार यांच्या निधनाच्या पार्श्वभूमीवर शोकसभा/श्रद्धांजली सभा आयोजित करण्यात आली होती या श्रद्धांजली कार्यक्रमाला उपस्थित सरपंच, उपसरपंच, माजी सरपंच उत्तम रामा चव्हाण, माजी सरपंच शंकर रत्ना राठोड, माजी सरपंच नारायण चिंतामण पवार, शिपाई कर्मचारी संदीप राठोड, युवा राज्यशास्त्र तज्ज्ञ ओमकार चव्हाण आदर्श चव्हाण आणि शेख अझर सह सर्व नागरिक उपस्थित होते

## युवकावर चाकूहल्ला

**▸विदर्भ केसरी। यवतमाळ**

: काहीही कारण नसताना एका युवकावर दोघांकडून चाकू हल्ला करण्यात आल्याची घटना पुसदच्या मोमीनपुरा परिसरात घडली. शेख साहील शेख शौकत (२०) रा. मोमीनपुरा वसंतनगर पुसद, असे या हल्ल्यात जखमी झालेल्या युवकाचे नाव आहे. तो ३० जानेवारी रोजी आसीफभाईच्या किरणा दुकानाजवळ असताना हा हल्ला करण्यात आला. शेख साहील शेख सुल्तान (२२) आणि शेख इब्राहीम शेख सुल्तान (३५) दोघेही रा. मोमीनपुरा या दोघांनी संगनमत करुन हल्ला केल्याचे फिर्यादीत नमूद आहे. या प्रकरणी शेख साहील शेख शौकत यांनी वसंतनगर पोलिस ठाण्यात तक्रार दाखल केली. त्यावरुन दोन हल्लेखोरांवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

## आर्णी रोडवरुन दुचाकी लंपास

**▸विदर्भ केसरी। यवतमाळ :**

येथील आर्णी रोडवरील एका हॉटेलसमोर उभी ठेवलेली दुचाकी अज्ञात चोरट्याने लंपास केली. या प्रकरणी नीरज गजानन मांदेवार (२६) यांनी अवधूतवाडी पोलिसात तक्रार दाखल केली आहे. ते मूळचे आर्णीच्या अरविंदनगरातील रहिवासी असून सध्या यवतमाळ येथील समर्थवाडी परिसरात राहतात. २२ जानेवारी रोजी ते आर्णी रोडवरील एका हॉटेलसमोर आपली दुचाकी (एमएच २९ सीजी ४८६९) उभी ठेवून काही कामासाठी गेले होते. दरम्यान अज्ञात चोरट्याने ही ६० हजार रुपये किमतीची दुचाकी चोरुन नेली. या प्रकरणी अवधूतवाडी पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे.

## न्यायाधीशांच्या निवासस्थानात चोरीचा प्रयत्न

यवतमाळ : चक्क न्यायाधीशाच्या निवासस्थानात चोरट्यांनी चोरीचा प्रयत्न केला. हा प्रकार पुसद येथे ३१ जानेवारीला उघडकीस आला. पुसद येथील न्यायाधीश राहत असलेल्या इमारतीच्या गेटची कडी उघडून चोरीचा प्रयत्न झाला. तशी फिर्याद पुसद शहर पोलिस ठाण्यात दाखल करण्यात आली आहे. या प्रकरणी निकेश मोहन आडे (२६) रा. पिंपळगाव सूतगिरणी ता. महागाव यांनी पुसद शहर पोलिस ठाण्यात फिर्याद दाखल केली आहे. त्यावरुन दोन अज्ञात इसमांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला असून अधिक तपास केला जात आहे.

# संविधानाच्या सन्मानासाठी 'जोडे मारो' आंदोलन

### संविधान सन्मानासाठी रस्त्यावर उतरले संघटना व पक्ष – गिरीश महाजन यांच्या निषेधार्थ 'जोडे मारो' आंदोलन

**▸विदर्भ केसरी। पुसद प्रतिनिधी विजय निखाते**

पुसद/ प्रजासत्ताक दिनाच्या शासकीय सोहळ्यात राज्याचे कॅबिनेट मंत्री गिरीश महाजन यांनी आपल्या भाषणात भारतीय संविधानाचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा नामोल्लेख केला नसल्याने समाजातील विविध घटकांमध्ये तीव्र संताप व्यक्त करण्यात येत आहे.

या पार्श्वभूमीवर, पुसद येथील सर्व सामाजिक संघटना, शिव–फुले–शाहू–बिरसा आणि संविधानाच्या विचारधारेचे कार्यकर्ते तसेच विविध राजकीय पक्षांचे पदाधिकारी यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना उपविभागीय अधिकारी यांच्या मार्फत निवेदन सादर केले. या निवेदनात मंत्री गिरीश महाजन यांनी केलेल्या कृत्याचा तीव्र निषेध नोंदवत त्यांच्यावर योग्य ती कारवाई करण्याची मागणी करण्यात आली. यावेळी सर्वप्रथम डॉक्टर बाबासाहेब यांच्या पूर्णकृती पुतळ्याला हारा अर्पण करीत बाबासाहेबांचा जयघोषाने आसमंत दणाणून टाकला होता. आंदोलनादरम्यान निदर्शकांनी गिरीश महाजन याच्या बॅनर प्रतिमेला 'जोडे मारो' आंदोलन करत निषेध व्यक्त केला.




"गिरीश महाजनांचा निषेध असो!", "संविधानाचा अपमान खपवून घेणार नाही!", "माधवीताई जाधव आगे बढो – हम तुम्हारे साथ है!" अशा जोरदार घोषणा देण्यात आल्या.

विशेष म्हणजे, प्रजासत्ताक दिनाच्या कार्यक्रमात संविधानाच्या सन्मानासाठी भर सभेत आवाज उठवणाऱ्या वनरक्षक माधवी जाधव यांच्या समर्थनार्थ आंदोलनात मोठ्या प्रमाणावर एकजूट दिसून आली. निदर्शकांनी स्पष्ट भूमिका घेत सांगितले की, संविधानासाठी उभे राहणे हा गुन्हा नसून प्रत्येक जागरूक नागरिकाचा हक्क आहे. आंदोलनकर्त्यांनी इशारा दिला आहे की, जर शासनाने या प्रकरणाची गंभीर दखल घेतली नाही, तर हे आंदोलन राज्यव्यापी स्वरूप धारण करेल.

या आंदोलनामध्ये भीम टायगर सेनेचे जिल्हाध्यक्ष किशोरदादा कांबळे, वंचित बहुजन आघाडीचे बुद्धरत्न भालेराव, बिरसा ब्रिगेडचे जिल्हाध्यक्ष मारोती भस्मे, भीम आर्मीचे विशाल डाके, टायगर ग्रुप चे युवराज कांबळे, तसेच जयानंद उबाळे, अरुण राऊत, विष्णू सरकटे, दीपक गायकवाड, प्रभाकर खंदारे, सुजाता कांबळे, वर्षा पठाडे, कृष्णा दोडके, ममता सुधाकर डोंगरे, जनार्दन झोडगे, गजानन कांबळे, सुदाम खांडेवार, मनोहर प्रकाश बोंबले, संदीप आढाव, शंकर भीमराव ढोले, एसएम भगत, दत्ता कांबळे, मारोतराव कांबळे, राहुल कुरील, देवराव वाघमारे, मिलिंद इंगोले, सुनिता राठोड, मधुकर ढोके, संघर्ष इंगोले, विनोद कांबळे, राजकुमार पठाडे, राहुल पडघने, राजेश कांबळे संतोष डोंगरे, किरण मुनेश्वर, रविकांत शिंगनकर, अरुण बरडे यांच्यासह शेकडो कार्यकर्त्यांनी आंदोलनामध्ये सहभाग घेतला होता.

## अकोला न्यायालयातून प्रियंकाला मरणोत्तर न्याय



**▸विदर्भ केसरी। पुसद प्रतिनिधी विजय निखाते**

पुसद : तालुक्यातील बोरी खुर्द येथील गर्भवती विवाहित प्रियंका हाटगडे हिच्या मृत्यू प्रकरणात अकोला येथील न्यायालयाने एफआयआर नोंदवून नव्याने तपास करण्याचे आदेश दिले आहेत. सुरुवातीपासून चुकीच्या व दबावाखालील तपासामुळे दडपले गेलेले हे प्रकरण पुन्हा न्यायाच्या प्रकाशात आले आहे.

प्रियंकाचे लग्न ३१ डिसेंबर २०२३ रोजी झाले होते. ४ ऑगस्ट २०२४ रोजी पाच महिन्यांची गर्भवती असताना तिच्यावर हुंड्याच्या मागणीवरून मारहाण आरोप आहे. पोटावर लाथा मारण्यात आल्या. वेदनेत करण्यात आल्याचा असतानाही तिने ११२ क्रमांकावर फोन करून मदतीची मागणी केली होती. उपचारादरम्यान तिचा गर्भ मृत झाला आणि काही दिवसांतच प्रियंकाचाही मृत्यू झाला. मात्र सुरुवातीला पोलिसांनी मृत्यू अपघाती असल्याचा अहवाल दिला होता. ॲड. आरिफ अहमद यांच्या निर्भीड व अभ्यासपूर्ण युक्तिवादानंतर न्यायालयाने अपघाती मृत्यूचा दावा फेटाळत एफआयआर नोंदवून वरिष्ठ अधिकाऱ्यांकडे तपास देण्याचे आदेश दिले आहेत. या निर्णयामुळे परिसरात समाधान व्यक्त होत असून, उशिरा का होईना प्रियंकाला मरणोत्तर न्याय मिळाल्याची भावना आहे.

## आर्णीत मोफत आरोग्य तपासणी व औषध वितरण शिबिर; ४५३ नागरिकांचा लाभ

**▸विदर्भ केसरी। आर्णी | प्रतिनिधी : बबिता शिवणकर**

आर्णी येथील स्थानिक नगर परिषद शाळा क्र. १ मध्ये नगरसेवक डॉ. नाहिद आरीज बेग यांच्या मार्गदर्शनाखाली व्यापक मोफत आरोग्य तपासणी व औषध वितरण शिबिर यशस्वीरीत्या पार पडले. या शिबिरात मधुमेह (शुगर), रक्तदाब (बी.पी.), संपूर्ण रक्त तपासणी, बी.एम.आय., सिकलसेल, कुष्ठरोग तपासणी तसेच सामान्य आरोग्य तपासणी करण्यात आली.

आर्णी शहरातील प्रभाग क्रमांक ८, ९ व १० मधील नागरिकांसाठी आयोजित या शिबिराला माजी मंत्री शिवाजीराव मोघे, आरीज बेग मिर्झा (उपाध्यक्ष, महाराष्ट्र काँग्रेस), नगराध्यक्ष नालंदा भरणे, अनिल आडे (सभापती, कृषी उत्पन्न बाजार समिती) यांची प्रमुख उपस्थिती लाभली.



शिबिरासाठी सुप्रसिद्ध मधुमेह तज्ज्ञ डॉ. सुनील गुप्ता (नागपूर) यांच्या पथकासह आर्णी ग्रामीण रुग्णालय, तालुका आरोग्य अधिकारी कार्यालय, आशा वर्कर्स यांचे सहकार्य मिळाले. डॉ. फैजान खान व डॉ. निलोफर खान यांनी रुग्ण तपासणी केली.

शिबिराच्या यशस्वी आयोजनासाठी काँग्रेस कार्यकर्ते तसेच नगरसेविका निताताई ठाकरे, रियाज सय्यद, शफी मलनस, अश्विनी संजय राऊत, यास्मिन रहेमान शाह, प्रीती योगेश शिवरामवार, भावना जयराज मुनेश्वर आदींनी विशेष परिश्रम घेतले. यावेळी राजूभाऊ बुटले, माधवराव जाधव, डॉ. श्याम गुटे, शिवरामवार सर, सागर घोडेराव, गफूर शाह, मकबूल शाह, खुशाल ठाकरे, संजय राऊत, गजानन राठोड, गणेश चिल्लरवार सर, विनोद माहेश्वरी, अमित पवार, गीताताई सनसेटवार, गिरिधर कुबडे, प्रसेनजीत खंडारे, ख्वाजा शेख लाल, दीपक देवतळे, तन्मय बागुल आदींनी उपस्थिती लावली.

या शिबिरात तब्बल ४५३ नागरिकांची तपासणी करून मोफत औषध वितरण करण्यात आले. डॉ. सुनील गुप्ता, डॉ. रमा बाजोरिया (वैद्यकीय अधीक्षक, ग्रामीण रुग्णालय), डॉ. आरती नाटकर (तालुका आरोग्य अधिकारी), डॉ. सुनील भवरे, डॉ. राम पद्मावार यांच्या मोलाच्या सहकार्यामुळे शिबिर यशस्वी झाल्याचे डॉ. नाहिद आरीज बेग यांनी सांगितले.नगर परिषद शाळेचे शिक्षक, नगर परिषद कर्मचारी, हाफीज बेग उर्दू शाळेचा स्टाफ, आशा वर्कर्स, वैद्यकीय कर्मचारी व सामाजिक कार्यकर्त्यांच्या एकत्रित प्रयत्नांतून हे शिबिर यशस्वी झाले. यापुढेही शहराच्या इतर भागांत अशाच प्रकारची आरोग्य शिबिरे लवकरच आयोजित करण्याचा मानस डॉ. नाहिद बेग यांनी व्यक्त केला.

## केंद्रीय अर्थसंकल्पातून ग्रामीण भारताची घोर उपेक्षा

### शेतकरी,कष्टकरी आणि कामगारांच्या तोंडाला पाने – प्रा.पंढरी पाठे यांची तीव्र टीका

**▸विदर्भ केसरी। यवतमाळ**

आज संसदेमध्ये केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी सादर केलेला केंद्रीय अर्थसंकल्प हा ग्रामीण भारत,शेतीवर अवलंबून असलेला शेतकरी,कष्टकरी आणि कामगार वर्गासाठी अत्यंत निराशाजनक व नकारात्मक असल्याची तीव्र प्रतिक्रिया शेतकरी चळवळीचे कार्यकर्ते प्रा.पंढरी पाठे यांनी व्यक्त केली आहे.



देशातील सुमारे ६५ टक्के लोकसंख्या आजही ग्रामीण भागात वास्तव्यास असून त्यांचे जीवनमान थेट शेती व शेतीपूरक व्यवसायांवर अवलंबून आहे. मात्र या अर्थसंकल्पामध्ये शेतीमालाला हमीभाव, कर्जमाफी, उत्पादन खर्चावर आधारित दर, सिंचन,पशुसंवर्धन,आदिवासी व कोरडवाहू भागातील विशेष तरतुदी याकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष करण्यात आल्याचे प्रा.पाठे यांनी सांगितले. ते म्हणाले की,"हा अर्थसंकल्प शेतकरी व कामगारांचा नसून मोठ्या उद्योगपती,कॉर्पोरेट कंपन्या आणि शहरी उच्चभ्रू वर्गाला खुश करण्यासाठी सादर करण्यात आला आहे. शेतकऱ्यांच्या आत्महत्या,वाढता उत्पादन खर्च,बियाणे-खते-कीटकनाशकांचे वाढते दर, नैसर्गिक आपत्तीमुळे होणारे नुकसान यावर ठोस उपाययोजना या अर्थसंकल्पात नाहीत." महागाई नियंत्रणाबाबतही सरकार अपयशी ठरले असून,डिझेल,वीज,खत,औषधे आणि दैनंदिन गरजेच्या वस्तूंच्या दरवाढीमुळे शेतकरी व कष्टकरी वर्ग पूर्णपणे मेटाकुटीला आला आहे.मनरेगा,सार्वजनिक वितरण व्यवस्था,आरोग्य व शिक्षण यांसारख्या ग्रामीण जीवनाशी थेट संबंधित योजनांसाठी भरीव तरतूद नसणे ही गंभीर बाब असल्याचेही प्रा.पाठे यांनी नमूद केले. कामगार वर्गाबाबत बोलताना त्यांनी सांगितले की,असंघटित क्षेत्रातील कामगार,शेतमजूर,महिला कामगार यांच्यासाठी कोणतीही ठोस सुरक्षा,वेतनवाढ किंवा सामाजिक संरक्षणाची हमी या अर्थसंकल्पात नाही. "कामगारांच्या श्रमावर देश उभा आहे,मात्र त्याच कामगाराला या अर्थसंकल्पात विसरले गेले आहे," अशी खंत त्यांनी व्यक्त केली. शेवटी प्रा.पंढरी पाठे यांनी स्पष्ट इशारा दिला की,"हा शेतकरी-विरोधी व ग्रामीण-विरोधी अर्थसंकल्प देशातील शेतकरी,कष्टकरी आणि कामगार स्वीकारणार नाहीत.या अन्यायकारक धोरणांच्या विरोधात येत्या काळात व्यापक शेतकरी व कामगार चळवळ उभी केली जाईल."

## टँकरच्या धडकेत दुचाकीस्वार ठार

**▸विदर्भ केसरी। यवतमाळ :**




एका भरधाव टँकरने एमएच २९ बीएन ४६५७ क्रमांकाच्या दुचाकीला धडक दिली. त्यात दुचाकीस्वार गंभीर जखमी होऊन जागीच ठार झाला. ही घटना खंडाळा पोलिस ठाण्याच्या हद्दीत इनापूर ते माळआसोली रोडवर ३१ जानेवारीला घडली. या प्रकरणी पवन बबन दांडेगावकर (२८) रा. सांडवा ता. पुसद यांनी खंडाळा पोलिसात तक्रार दाखल केली आहे. त्यावरुन पोलिसांनी एमएच ३० बीडी ०३७५ क्रमांकाच्या टँकरच्या चालकावर गुन्हा दाखल केला आहे.

## मद्यधुंद चालकाचा सैराट धुमाकूळ

### हॉर्न वाजवत भरधाव गाडी; अपघात टळल्याने अनेकांचे प्राण वाचले

**▸विदर्भ केसरी। दिग्रस | प्रतिनिधी**

दिग्रस शहरात आज दुपारी मद्यधुंद अवस्थेतील एका चालकाने भरधाव वाहन चालवत अक्षरशः धुमाकूळ घातल्याची घटना घडली. संबंधित चालक सतत हॉर्न वाजवत शहरातील मुख्य रस्त्यांवरून बेधुंदपणे वाहन चालवत होता. विशेष म्हणजे वाहन डिझेलने पूर्णपणे भरलेले असल्याने मोठा अपघात होण्याची भीती नागरिकांत निर्माण झाली होती.



चालकाने वाहतुकीचे कोणतेही नियम न पाळता, समोर येणाऱ्या वाहनांना कट मारत, पादचाऱ्यांना जीव मुठीत धरून चालायला भाग पाडले. काही ठिकाणी वाहन अपघाताच्या अगदी जवळ गेले होते; मात्र सुदैवाने मोठी दुर्घटना टळली आणि अनेक नागरिकांचे प्राण वाचले. सामाजिक कार्यकर्ते यामध्ये येऊन गाडी अडवून कानाखाली दिग्रस फटका दिला या प्रकारामुळे शहरात काही काळ भीतीचे वातावरण निर्माण झाले होते. नागरिकांनी तत्काळ पोलिसांना माहिती दिल्यानंतर संबंधित चालकावर कारवाई करण्यात आल्याची माहिती आहे. धनोडा येथील पेट्रोल पंप चालकाची आहे गाडी आहे समजले ही गाडी दिग्रस पोलीस स्टेशनच्या कर्मचारी यांनी ताब्यात घेतली आहे ..

# वादा किया था निभाने का... पण फसवणुकीचं बजेट दिलं!

### अर्थसंकल्प म्हणजे निवडणुकीपूर्वी दिलेल्या आश्वासनांची आणि जनतेच्या विश्वासाची फसवणूक : गायकवाड

**▸विदर्भ केसरी।**

केंद्र सरकारने सादर केलेला अर्थसंकल्प म्हणजे देशातील शेतकरी, कष्टकरी, युवक आणि सर्वसामान्य नागरिकांची उघडपणे केलेली थट्टा आहे. "सबका साथ, सबका विकास" या घोषणांचा बुरखा पुन्हा एकदा या बजेटमधून गळून पडला असून, वास्तवात हे बजेट "मोजक्यांचा विकास आणि बहुसंख्यांची उपेक्षा" करणारे ठरले आहे, अशी प्रतिक्रीया जिल्हा काँग्रेस उपाध्यक्ष अनिल गायकवाड यांनी दिली.



देशातील शेतकरी आत्महत्येच्या कड्यावर उभा असताना, उत्पादनखर्च गगनाला भिडलेला असताना आणि नैसर्गिक आपत्तीमुळे शेती पूर्णपणे उद्ध्वस्त होत असताना, या बजेटमध्ये शेतकऱ्यांसाठी दिलासा देणारी एकही ठोस घोषणा नाही. किमान आधारभूत किंमत कायदेशीर करण्याच्या मागणीला सरकारने पुन्हा एकदा केराची टोपली दाखवली आहे. कर्जमाफी, पीकविमा सुधारणा, सिंचन आणि ग्रामीण पायाभूत सुविधांवर मोठी गुंतवणूक — या सगळ्या बाबींकडे केंद्र सरकारने पाठ फिरवली आहे.

सर्वसामान्य माणूस आज महागाईने अक्षरशः मेटाकुटीला आलेला आहे. गॅस सिलिंडर, पेट्रोल-डिझेल, औषधे आणि जीवनावश्यक वस्तूंचे दर वाढतच आहेत. मात्र या बजेटमध्ये महागाईवर नियंत्रण आणण्यासाठी किंवा करांचा बोजा कमी करण्यासाठी कोणतीही ठोस दिशा नाही. मध्यमवर्गीय आणि गरीब जनतेला दिलासा देण्याऐवजी, त्यांच्या खिशावर आणखी भार टाकण्याचे काम या बजेटने केले आहे.

देशातील युवकांसाठी हे बजेट म्हणजे पूर्णतः निराशेचा संदेश आहे. कोट्यवधी युवक बेरोजगार असताना, सरकारी भरती रखडलेल्या असताना आणि शिक्षण खासगीकरणाकडे ढकलले जात असताना, रोजगारनिर्मितीबाबत ठोस योजना नाहीत. शिक्षण क्षेत्राला आवश्यक निधी न देता, केवळ घोषणा आणि आकड्यांच्या जादूमध्ये युवकांचे भविष्य गहाण ठेवले जात आहे.

एकंदरीत, हा अर्थसंकल्प म्हणजे निवडणुकीपूर्वी दिलेल्या आश्वासनांची आणि जनतेच्या विश्वासाची उघडपणे फसवणूक आहे. शेतकरी, कामगार, युवक आणि सर्वसामान्य नागरिकांच्या प्रश्नांवर मौन बाळगणारे हे बजेट आम्ही काँग्रेस पक्षाच्या वतीने ठामपणे नाकारतो. जनतेच्या हक्कासाठी आणि न्यायासाठी रस्त्यापासून संसदपर्यंत संघर्ष सुरू ठेवण्याचा निर्धार आम्ही यानिमित्ताने व्यक्त करतो.

### कष्टकरी आणि शेतकऱ्यांच्या जखमेवर मीठ चोळणारा प्रकार - आ. संजय देरकर

**■ "आज सादर झालेला अर्थसंकल्प पाहता, सरकारने पुन्हा एकदा हे सिद्ध केले आहे की त्यांना सामान्य शेतकरी, कष्टकरी आणि शेतकर्यांच्या प्रश्नांशी काहीही देणंघेणं नाही. हा अर्थसंकल्प केवळ मूठभर भांडवलदार आणि कॉर्पोरेट जगताला खूश करण्यासाठी आखलेला एक 'इव्हेंट' आहे. शेतकऱ्यांची फसवणूक: ज्या बळीराजाच्या जिवावर देश उभा आहे, त्या शेतकऱ्यांच्या हमीभावाबद्दल किंवा कर्जमाफीबद्दल या अर्थसंकल्पात सोयीस्कर मौन पाळले आहे. बियाणे, खते आणि डिझेलच्या वाढत्या किमतींमुळे शेतकरी आधीच मेटाकुटीला आला असताना, सरकारने त्याला वाऱ्यावर सोडले आहे.आदिवासी बांधव, कोरडवाहू भागातील कष्टकरी आणि उपेक्षित घटकांसाठी कोणत्याही विशेष तरतुदी या अर्थसंकल्पात दिसत नाहीत. आरोग्यापासून शिक्षणापर्यंतच्या ग्रामीण भागाशी निगडित योजनांकडे केलेले दुर्लक्ष हे अत्यंत गंभीर आहे. असंघटित क्षेत्रातील कामगार, शेतमजूर आणि महिला कामगारांच्या सामाजिक सुरक्षेसाठी किंवा वेतनवाढीसाठी कोणतीही ठोस पावले उचललेली नाहीत. त्यांच्या श्रमावर देश चालतो, पण त्यांनाच विसरण्याचा अमानवीय प्रकार सरकारने केला आहे. घरगुती गॅसपासून ते दैनंदिन गरजेच्या वस्तू पर्यंतच्या महागाईवर नियंत्रण मिळवण्यात हे सरकार पूर्णपणे अपयशी ठरले आहे.**

## दीड लाखांच्या रिक्षासह देशी दारू जप्त



**▸विदर्भ केसरी। पांढरकवडा**

पाटणबोरी येथून रिक्षाद्वारे पिंपरी गावाकडे होणारी अवैध देशी दारूची तस्करी पांढरकवडा पोलिसांनी उधळून लावली आहे. गुन्हे शोध पथकाने (DB) रविवारी, १ फेब्रुवारी रोजी केलेल्या या कारवाईत रिक्षासह १ लाख ६५ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला असून, झरी तालुक्यातील वठोली येथील एका आरोपीला अटक केली आहे.

पांढरकवडा पोलीस स्टेशनचे गुन्हे शोध पथक परिसरात पेट्रोलिंग करत असताना, त्यांना गोपनीय बातमीदाराकडून माहिती मिळाली की, एका पिवळ्या रंगाच्या रिक्षातून अवैध दारूची वाहतूक केली जात आहे. या माहितीवरून पथकाने पाटणबोरी येथील ऑटो पॉईंटवर सापळा रचून रिक्षा (क्र. AP-01 TA-0072) अडवली. रिक्षाची झडती घेतली असता, मागील बाजूस खाकी रंगाचे चार खोके आढळले. या प्रकरणी रिक्षा चालक विठ्ठल लच्छमन्ना बासावार (वय ४७, रा. वठोली, ता. झरी) याला ताब्यात घेण्यात आले आहे. आरोपीविरुद्ध पांढरकवडा पोलीस ठाण्यात महाराष्ट्र दारूबंदी कायद्याच्या कलम ६५ (अ) (ई) अन्वये कायदेशीर कारवाई करण्यात आली आहे.

### सख्ख्या भावांचा कालव्यात बुडून मृत्यू

▸विदर्भ केसरी।भंडारा जिल्ह्यातून एक अत्यंत हृदयद्रावक घटना समोर आली आहे.



पर्यटनाचा आनंद लुटण्यासाठी आणि ऐतिहासिक वारसा अनुभवण्यासाठी गेलेल्या दोन तरुण भावांवर काळाने घाला घातला आहे. तुमसर तालुक्यातील प्रसिद्ध अंबागड किल्ला पाहिल्यानंतर, जवळच असलेल्या बावनथडी प्रकल्पाच्या डाव्या कालव्यात आंघोळीसाठी उतरले असता, पाण्याचा अंदाज न आल्याने दोन सख्ख्या भावांचा बुडून मृत्यू झाला. ही धक्कादायक घटना शनिवारी दुपारी घडली.

**महत्त्वाचे**

### अभ्यास दौऱ्यातुन मिळालेल्या प्रेरणेतून खजूर पिकाची लागवड!

**▸विदर्भ केसरी। राजकुमार चिंचोळकर बाळापूर**



बाळापूर तालुक्यातील मौजे देगाव हा भाग तसा लिंबू पिकासाठी प्रसिद्ध परंतु लिंबू पिकावरील रोग व कीड यामुळे पीक उत्पादनात फारशी शाश्वती राहली नाही.परंतु महाराष्ट्रातील विशेषत: विदर्भातील वातावरण खजुराच्या शेतीसाठी अतिशय उपयुक्त ठरू शकते.खजुरासाठी 25 ते 30 अंश सेंटिग्रेड तापमानाची आवश्यकता असते. परंतु खजूर पीक 50 अंश सेल्सिअस मध्ये देखील तग धरून राहते.यासाठी मागील वर्षी कृषी विभागाच्या (आत्मा) यंत्रणा मार्फत राज्यांतर्गत शेतकरी अभ्यास दौऱ्याचे आयोजन आंबा,केळी,मोसंबी खजूर लागवड केलेल्या जालना,सिंदखेडराजा येथील प्रयोगशील शेतकऱ्यांच्या प्रक्षेत्रावर आयोजन करण्यात आले होते.यामध्ये शेतकऱ्यांनी त्यांच्याकडून संपूर्ण पिकाबद्दल माहिती घेण्यात आली.आत्मा अभ्यासदौऱ्याच्या माध्यमातून प्रेरीत होऊन देगाव येथील शेतकरी श्रीकृष्ण लढे,विलास वरोकार यांनी प्रायोगिक तत्त्वावर एक एकर क्षेत्रावर बारही,खुनुजी या जातीची टिशूकल्चर खजूराची लागवड तालुका कृषी अधिकारी सागर डोंगरे,कृषी विज्ञान केंद्र अकोला येथील विषयतज्ञ गजानन तुपकर,तालुका तंत्र व्यवस्थापक व्ही एम शेगोकार,सहाय्यक कृषी अधिकारी एम बी राठोड, अशोक करवते,यांच्या हस्ते पूजन करून लागवड करण्यात आली.

### आदिवासी संग्रहालयाचा कोनशिला समारंभ

**▸विदर्भ केसरी। नागपूर,**



राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या "महात्मा ज्योतिबा फुले शैक्षणिक परिसर" येथे "पीएम उषा" द्वारे प्राप्त निधी अंतर्गत आदिवासी इतिहास संग्रहालय इमारतीच्या बांधकामाचा कोनशिला समारंभ संपन्न झाला. हा कार्यक्रम डॉ. मनाली क्षीरसागर, कुलगुरू, राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ यांच्या शुभहस्ते पार पडला. समारंभास डॉ. राजू हिवसे, कुलसचिव; डॉ. शाम राव कोरेटी, विभाग प्रमुख, इतिहास विभाग; डॉ. रुपेश वडेरे, समन्वयक, पीएम_उषा; विनोद इलमे, विद्यापीठ अभियंता; हरीश पालीवाल, वित्त व लेखा अधिकारी; दिनेश शेराम व प्रथमेश फुलेकर, अधिसभा सदस्य, तसेच सर्व अधिष्ठाता, अधिकारी व मान्यवर उपस्थित होते. tribal museum या आदिवासी इतिहास संग्रहालयाचा उद्देश आदिवासी संस्कृती, परंपरा आणि ऐतिहासिक वारसा जतन करणे असून, विद्यापीठाच्या शैक्षणिक व सांस्कृतिक विकासात हा उपक्रम महत्त्वपूर्ण ठरेल.

# लाडक्या बहिणींना 2100 रुपये देणार

## ज्या उमेदवाराच्या मागे महिला, त्याचा नंबर पहिला; एकनाथ शिंदेंची कोल्हापुरातून मोठी घोषणा

**▸विदर्भ केसरी।**

एकनाथ शिंदे हा शब्दाचा पक्का आहे, लाडक्या बहिणींना लखपती केल्याशिवाय थांबणार नाही. लवकरच आम्ही लाडक्या बहिणींना 2100 रुपये देणार, असे विधान उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी केले आहे. कोल्हापूरच्या कागल येथे एका जाहीर सभेत ते बोलत होते. ज्या उमेदवाराच्या मागे महिला, त्याचा मत पेटीत नंबर पहिला. त्यामुळे दर महिन्याला ओवाळणी देणारा हा भाऊ आज विनंती करायला आला असल्याचे यावेळी एकनाथ शिंदे म्हणाले.

आगामी जिल्हा परिषद आणि पंचायत समितीच्या निवडणुकीच्या अनुषंगाने प्रचार सुरू झाल्या आहेत. एकनाथ शिंदे हे आज कोल्हापूर दौऱ्यावर असून यावेळी बोलताना त्यांनी सुरुवातील दिवंगत अजित पवारांना अभिवादन केले. ते म्हणाले, अशा दुःखात देखील आम्हाला प्रचाराला यावे लागत आहे. या निवडणुका लढवय्या कार्यकर्त्यांच्या असतात, त्या पुढे ढकलता येत नाहीत. आम्ही प्रचार साधेपणाने करतो, कोणाच्या भावना दुखावणार नाहीत याची काळजी घेतो, असे शिंदे म्हणाले.

पुढे बोलताना एकनाथ शिंदे म्हणाले, कोल्हापूरच्या मातीला एक वेगळा सुगंध आहे. संजय मंडलिक तुम्ही एकटे नाहीत, ही जनता तुमच्या सोबत आहे. काही लोक स्वतःच्या स्वार्थासाठी एकत्र आली आहेत. ही लढाई जनशक्ती विरुद्ध धनशक्ती अशीह आहे आणि या लढाईत नेहमी जनशक्ती जिंकते. सत्तेसाठी एकत्र आला असला तरी जनता ठरवते कोणाला आपले मत द्यायचे, असे म्हणत त्यांनी विरोधकांवर निशाणा साधला.

लाडकी बहीण योजनेविषयी बोलताना एकनाथ शिंदे म्हणाले, लाडक्या बहिणींना लखपती केल्याशिवाय एकनाथ शिंदे थांबणार नाही. दर महिन्याला ओवाळणी देणारा हा भाऊ आज विनंती करायला आला आहे. लाडक्या बहिणींना आम्ही लवकरच 2100 रुपये देणार आहोत, असे आश्वासन एकनाथ शिंदे यांनी यावेळी दिले आहे.

तसेच जिल्हा परिषद आणि पंचायत समिती निवडणूक ही पक्षाची पाया रचणारी निवडणूक आहे. मी आज नेहमी सारखे भारण करणार नाही. केवळ कार्यकर्त्यांच्या आग्रहाखातर प्रचाराला आलो आहे, असे एकनाथ शिंदेंनी स्पष्ट केले. नगरपरिषद आणि महानगरपालिका पालिका निवडणुकीत शिवसेना राज्यात दुसऱ्या नंबरचा पक्ष राहिला आहे. कोल्हापूर जिल्ह्यात शिवसेनेचे 5 आमदार आहेत आणि एक खासदार आहे. संजय मंडलिक गेल्या वेळी थोडक्यात सुटले, पुढच्या वेळी नक्की बरोबर पकडतील असा विश्वासही एकनाथ शिंदे यांनी व्यक्त केला आहे.




# पिक विमा तत्काळ जमा करा अन्यथा आंदोलन!

## क्रांतिकारी शेतकरी संघटनेचा मूर्तिजापूर उपविभागीय अधिकारी यांच्या मार्फत मुख्यमंत्र्यांना इशारा.

**▸विदर्भ केसरी। मूर्तिजापूर**

वर्ष २०२५ च्या खरीप हंगामात झालेल्या अस्मानी संकटामुळे पिचलेल्या शेतकऱ्यांना अद्यापही पीक विम्याची प्रतीक्षाच आहे. ऑगस्ट-सप्टेंबर महिन्यात झालेल्या ढगफुटीसदृश पावसामुळे सोयाबीन आणि तूर पिकाचे अतोनात नुकसान झाले असून, सरकारने जाहीर केलेली तुटपुंजी मदत अपुरी पडत आहे. या पार्श्वभूमीवर, क्रांतिकारी शेतकरी संघटना, मूर्तिजापूर यांच्या वतीने मुख्यमंत्र्यांच्या नावे उपविभागीय अधिकाऱ्यांना निवेदन सादर करण्यात आले असून, पिक विमा तत्काळ खात्यात जमा न झाल्यास तीव्र आंदोलनाचा इशारा देण्यात आला आहे.




निवेदनात नमूद केल्यानुसार, शासनाने प्रधानमंत्री पिक विमा योजनेतील नैसर्गिक आपत्ती नुकसान भरपाईचे जुने निकष रद्द केल्यामुळे जिल्ह्यातील बहुतांश शेतकरी विम्याच्या लाभापासून वंचित राहिले आहेत. सरकारने राज्यात ओला दुष्काळ जाहीर करून काही प्रमाणात मदत दिली असली, तरी ती पिकांच्या झालेल्या नुकसानीच्या तुलनेत नगण्य आहे.

राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सर्व बाधित शेतकऱ्यांना पिक विम्याचा लाभ दिला जाईल, असे जाहीर आश्वासन दिले होते. मात्र, या घोषणेला आता सहा महिन्यांहून अधिक काळ उलटून गेला आहे. अद्याप प्रशासकीय स्तरावर पिक विमा वितरणासंदर्भात कोणतीही ठोस हालचाल दिसत नसल्याने शेतकऱ्यांमध्ये संतापाची लाट उसळली आहे. शेतकरी आज अस्मानी आणि सुलतानी अशा दोन्ही संकटांनी वेढला गेला आहे. मुख्यमंत्र्यांनी दिलेला शब्द पाळावा आणि शेतकऱ्यांच्या हक्काचा विमा त्यांच्या खात्यात तात्काळ वर्ग करावा. अन्यथा, लोकशाही मार्गाने क्रांतिकारी शेतकरी संघटना रस्त्यावर उतरून संघर्ष करेल.

राहुल वानखडे, जिल्हा संघटक शेकडो पदाधिकाऱ्यांची उपस्थिती जिल्हा संघटक राहुल वानखडे यांच्या नेतृत्वाखाली देण्यात आलेल्या या निवेदनावेळी संघटनेचे अनेक दिग्गज पदाधिकारी उपस्थित होते. यामध्ये प्रामुख्याने रियाज भाई जिल्हा उपाध्यक्ष प्रवीण पाटील खोत, संतोष रुद्रकार रामदास भगत, श्यामभाऊ पाचळे सचिन देशमुख, युवराज घाडगे. यांसह शेकडो कार्यकर्ते आणि बाधित शेतकरी यावेळी उपस्थित होते. आता शासन या निवेदनाची दखल घेऊन शेतकऱ्यांना दिलासा देणार की आंदोलनाचा भडका उडणार, याकडे संपूर्ण तालुक्याचे लक्ष लागले आहे.

# रिंग रोड भूसंपादनावर नागरिकांचा रोष कायम

**▸विदर्भ केसरी।**

विहितगाव, वडनेर रोड परिसरातून प्रस्तावित रिंग रोडच्या भूसंपादनाबाबत निर्माण झालेला संभ्रम व नागरिकांच्या प्रश्नांवर चर्चा करण्यासाठी खा. राजाभाऊ वाजे यांच्या अध्यक्षतेखाली आयोजित बैठकीत शेतकरी, जमीनधारक तसेच गुंठेवारी प्लॉटधारक आदींनी रोष व्यक्त करत, जमिनीचा योग्य मोबदला देण्याची मागणी केली. खा. राजाभाऊ वाजे यांच्या अध्यक्षतेखाली वडनेर रोड येथे झालेल्या या बैठकीस परिसरातील शेतकरी, जमीनमालक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

बैठकीच्या प्रारंभी स्व. अजितदादा पवार यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून आदरांजली वाहण्यात आली. बैठकीस प्रांत अधिकारी अर्पिता ठुबे, उपजिल्हाधिकारी रवींद्र भारदे, भूसंपादन अधिकारी राजेंद्र वाघ, एमएसआरडीसीचे विजयकुमार कोळी, अभिजित नाईक, बिपीन काजळे, वकील डुंबळे आदी उपस्थित होते. यावेळी नागरिकांनी प्रशासनाच्या भूमिकेवर तीव्र नाराजी व्यक्त केली.

### खासदारांकडे मांडल्या तक्रारी

- **अधिकाऱ्यांनी सर्व प्रश्नांची उत्तरे दिल्यानंतर सर्व नागरिक जागेवरून उठून आले आणि एकच गोंधळ करत गर्दी केली होती. यावेळी सर्व अधिकारी व खासदारांना गराडा घालत खासदारांकडे तक्रारी केल्या.**
- **एमएसआरडीसीच्या सल्लागारांच्या अहवालानुसार ६६.६५ मी. रुंदीचा आणि १६.५ किमी लांबीचा रिंग रोड प्रस्तावित आहे. ३.४ किमी भागात मोबदला देण्यात आला असून, उर्वरित ठिकाणी बदल होतील. ज्या ठिकाणी अतिरिक्त जमीन घेतली जाईल, त्याचा योग्य मोबदला देऊ रस्त्याला सर्व्हिस रोडची तरतूद असून, दोन पूल बांधण्यात येतील.**
**- विजयकुमार कोळी, एमएसआरडीसी अधिकारी**

२०१७ मध्ये मंजूर झालेल्या डी. पी. रोडच्या आराखड्यात व सध्याच्या प्रस्तावित रस्त्यात मोठे बदल दिसत असल्याचे सांगत भूसंपादनासाठी आवश्यक असलेले प्रत्यक्ष मार्किंग अद्याप करण्यात आलेले नसल्याने संभ्रम वाढला आहे. कोणत्या सर्व्हे नंबरची जमीन जाणार आहे, त्यावर संबंधित मालकांची नावे स्पष्टपणे नमूद करणे आवश्यक असल्याची मागणी यावेळी करण्यात आली.

संयुक्त मोजणी करताना एका जमिनीत दोन मालक असतील, तर दोघांची नावे नोंदविण्यात यावीत, तसेच बाधित जमिनीचा योग्य मोबदला देण्यात यावा, अशी ठाम भूमिका शेतकऱ्यांनी मांडली. जमिनीच्या मागील तीन वर्षांच्या व्हॅल्यूएशननुसार मोबदला द्यावा, झोननिहाय दर निश्चित करावेत आणि बालाजी देवस्थानच्या जमिनीचा मोबदला मूळ मालकालाच देण्यात यावा, अशा ठोस मागण्या यावेळी करण्यात आल्या. नागरिकांच्या शंकांचे निरसन करताना भूसंपादन अधिकारी राजेंद्र वाघ यांनी सांगितले की, हे भूसंपादन कायद्यानुसार केले जात असून, कलम ११ अंतर्गत सर्व शेतकऱ्यांना नोटिसा देण्यात आल्या आहेत. बैठकीत विविध मुद्द्यांवर चर्चा झाली असून, नागरिकांच्या मागण्यांचा सकारात्मक विचार करून योग्य तोडगा काढण्याचे आश्वासन खासदार राजाभाऊ वाजे यांनी दिले.

# विनापरवाना मुरूम वाहतूक करणारे दोन ट्रॅक्टर जप्त

**मूर्तिजापूर ग्रामीण पोलिसांची मोठी कारवाई.**

**▸विदर्भ केसरी। मूर्तिजापूर प्रतिनिधी .**

अवैध गौण खनिज उत्खनन आणि वाहतुकीविरोधात महसूल विभाग आणि पोलिसांनी धडक कारवाई सुरू केली आहे. मूर्तिजापूर ग्रामीण पोलीस स्टेशन अंतर्गत येणाऱ्या कंझरा येथे अवैध मुरूम वाहतूक करणारे दोन ट्रॅक्टर पकडण्यात आले असून, चालकांविरुद्ध गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. दिनांक २९ जानेवारी २०२६ च्या रात्री ११:०० वाजेच्या सुमारास, कंझरा येथील जागेश्वर मंदिराजवळ महसूल विभागाचे मंडळ अधिकारी. रवींद्र पुरी यांनी नाकाबंदी केली होती. यावेळी दोन विना नंबरचे ट्रॅक्टर संशयास्पद रित्या मुरूम खाली करताना आढळले. अधिकारी यांनी विचारणा केली असता, चालकांकडे मुरूम वाहतुकीचा कोणताही परवाना (रॉयल्टी) किंवा अधिकृत पास नव्हता. शासनाची दिशाभूल करून विनापरवाना गौण खनिजाची चोरी केल्याचे निष्पन्न झाल्याने ही कारवाई करण्यात आली.

जप्त केलेला मुद्देमाल
या कारवाईत पोलिसांनी एकूण ४ लाख ४ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे, ज्यामध्ये:
दोन विना नंबरचे ट्रॅक्टर मुंडा व ट्रॉलीसह, - किंमत अंदाजे ४ लाख रुपये.
दोन ब्रास मुरूम - किंमत अंदाजे ४,००० रुपये.

आरोपींची माहिती
या प्रकरणात खालील दोघांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे:
१. योगेश अशोकराव देशमुख वय ४० वर्ष, रा. कंझरा
२. प्रशांत गजानन देशमुख वय ३९ वर्ष, रा. कंझरा

कायदेशीर कारवाई
तहसील कार्यालयाचे मंडळ अधिकारी महादेव उत्तमराव भगत यांच्या तक्रारीवरून मूर्तिजापूर ग्रामीण पोलीस स्टेशनचे ठाणेदार श्रीधर गुट्टे यांच्या मार्गदर्शनाखाली,पोलिसांनी भारतीय न्याय संहिता २०२३ (BNS) च्या कलम ३०३ (२) सह खाण व खनिज अधिनियम १९५८ च्या कलम ३, ४, २१ अन्वये गुन्हा दाखल केला आहे.
दाखल अधिकारी शकुंतला सदार
तपास अधिकारी, HC राजेश डोंगरे (ब.नं. २०६५)
गौण खनिजाची तस्करी करणाऱ्यांविरुद्ध महसूल विभाग आता अधिक आक्रमक झाला असून, अशा कारवाया पुढेही सुरू राहतील असा इशारा प्रशासनाने दिला आहे.

# श्रीक्षेत्र दिग्रस बु. श्री सोपीनाथ महाराज यात्रा महोत्सव!

### हजारो भाविक घेणार महाप्रसादाचा लाभ

**▸विदर्भ केसरी। राजकुमार चिंचोळकर**

**बाळापूर :** पातुर तालुका पंचक्रोषीतील दिग्रस बु. येथे सोपीनाथ महाराज संस्थान च्या वतीने किर्तन व भजन सप्ताह तसेच दोन दिवसीय यात्रा महोत्सवाचे भव्य दिव्य आयोजन दि ६ व ७फेब्रुवारी रोजी करण्यात आले असून, दि २ फेब्रुवारी सोमवार रोजी देवांचे लग्न व सायंकाळी ६ वाजता महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले आहे.यावेळी संस्थानचे विश्वस्थ संचालक मंडळ तसेच गावकरी यांनी देवांचे लग्न सोहळा तथा भव्य दिव्य महाप्रसाद, सप्ताह तसेच



यात्रे करीता जय्यत तयारी केली आहे. . यावेळी दि २ ते ६ फेब्रुवारी सोमवार ते शुक्रवार रात्री ८ ते १० पर्यंत हभप गोपाळ महाराज उरळ, शुभम महाराज आखरे खिरपुरी, गजानन महाराज गायकवाड त्रिंतव, नंदु महाराज इंगळे चांदुर, रामकृष्ण महाराज कचाले तुलंगा यांचे हरिकिर्तनाचा कार्यक्रम राहील तसेच गायनाचार्य हभप संतोष पाटील महाराज, मृदंगाचार्य हभप ज्ञानेश्वर महाराज केकन, तसेच श्री गजानन महाराज ग्रंथाचे पारायण हभप रामकृष्ण महाराज कचाले यांच्या वाणीतुन दररोज सकाळी ९ ते १ पर्यंत राहील. तसेच यावेळी धर्णेकरू करीता जागेची व्यवस्था केलेली आहे. तसेच या भव्य दिव्य यात्रेमध्ये हलवाई दुकाणे, अल्पो अहार दुकाणे, खाणावळी, पालपडदे, आकाश पाळणे, सिनेमा वैगेरे यांना आपआपली व्यवसाय करण्याकरीता पुरेस्या जागेची व्यवस्था केली असुन त्यांना पंच मंडळा कडुन आवाहन करण्यात येत आहे. कायदा व सुव्यवस्था बाधीत होवु नये तसेच नागरीकांच्या सुरक्षेच्या दृष्टीने यात्रेच्या ठिकाणी पोलीस रावटी उभारून चोख पोलीस बंदोबस्त ठेवण्यात येणार आहे. पंचक्रोषीतील भावीकांनी देवांच्या दर्शणाचा तथा यात्रा महोत्सवाचा लाभ घेण्याचे आवाहन पंच मंडळाकडुन करण्यात आले आहे.

# ऐन रब्बी हंगामात युरियाची टंचाई; शेतकरी अडचणीत

## गहू,चना,कांदा पिके धोक्यात; कृषी विभागाचे दुर्लक्ष की नियोजित टंचाई?

**▸विदर्भ केसरी। शिरसगाव कसबा प्रतिनिधी अक्षय गुर्जर:-**

चांदुर बाजार तालुक्यातील शिरसगाव कसबा हद्दीत सध्या युरिया खताची तीव्र टंचाई निर्माण झाली असून रब्बी हंगामातील शेतकरी मोठ्या संकटात सापडला आहे.गहू, चणा,कांदा,भाजीपाला तसेच इतर पिकांना वेळेत युरिया न मिळाल्यास पिके पिवळी पडून उत्पादनात घट होण्याची भीती शेतकऱ्यांना वाटत आहे. गावात व परिसरात अनेक कृषी सेवा केंद्रे असतानाही युरिया उपलब्ध नसल्याचे चित्र आहे.परिणामी, शेतकरी एका दुकानातून दुसऱ्या दुकानात भटकंती करूनही युरिया



नसल्याने हवालदिल झाला आहे.

**■ टंचाई का आणि कशासाठी? जेव्हा युरियाची मागणी सर्वाधिक,त्याचवेळी टंचाई का?**

कृषी विभागाने आधीच अंदाज घेऊन साठा उपलब्ध करून देणे अपेक्षित होता.शासन एकीकडे "शेतकऱ्यांना युरियाची कमतरता पडू देणार नाही"असे जाहीरपणे सांगते, मग प्रत्यक्षात शेतकऱ्यांना युरिया कमी का पडतो? असा थेट सवाल उपस्थित होत आहे. ही टंचाई जाणीवपूर्वक निर्माण करून आर्थिक नफाखोरी तर केली जात नाही ना?अशी चर्चा बळावत आहे. जर साठेबाजी करून जादा दराने युरिया विकण्याचे प्रकार सुरू असतील, तर यावर नियंत्रण ठेवणारी यंत्रणा नेमकी कुठे आहे, असा प्रश्न शेतकरी विचारत आहेत.

**■ परराज्यात युरिया पुरवठा; काळाबाजाराचा संशय गडद?**

सूत्रांच्या माहितीनुसार,महाराष्ट्र सीमेलगत मध्यप्रदेशातील अनेक गावांतील शेतकरी शिरसगावसह चांदुर बाजार तालुक्यातील विविध कृषी केंद्रांवरून मोठ्या प्रमाणात युरिया अधिक दराने खरेदी करून नेत असल्याची चर्चा शेतकऱ्यांमध्ये सुरू आहे. स्थानिक शेतकऱ्यांना युरिया नाही आणि जास्त दराने परराज्यातील शेतकऱ्यांना युरिया विकत असल्याची संतप्त चर्चा होत आहे.

परिसरात तातडीने युरिया पुरवठा सुरळीत करावा.साठेबाजीवर कडक कारवाई करावी.कृषी केंद्रांवर साठ्याची तपासणी करावी. अन्यथा रब्बी हंगामातील पिकांचे मोठे नुकसान होण्याची शक्यता असून, त्याची जबाबदारी कोण घेणार? असा थेट सवाल आता शेतकरी करत आहेत.

- **ग्रामीण भागात युरिया साठा पुरेसा उपलब्ध असून,शहरात थोड्या प्रमाणात कमतरता जाणवत आहे.सद्यस्थिती ६ हजार युरिया बॅग्स उपलब्ध असून,येत्या २ दिवसांत जिल्ह्याला ३ ते ४ रॅक युरिया उपलब्ध होईल.गव्हासाठी मागणी वाढल्याने कमतरता भासत आहे. अवैध साठा किंवा जादा दराने विक्री होत असल्यास,तक्रार कृषी विभागाकडे करावी,निश्चित कारवाई केल्या जाईल.युरिया नियमित पुरवठा करण्यासाठी वरिष्ठ पत्रव्यवहार केलेला आहे.**
**- प्रवीण मोहोड तालुका कृषी अधिकारी, चांदुर बाजार**
- **साठा असल्यानंतरही कृषी सेवा केंद्रावरून कारणे सांगून युरिया मिळत नाही.गोदामांची तपासणी करून शेतकऱ्यांना योग्य तो न्याय देऊन युरिया उपलब्ध करावा.**
**- प्रशांत ठाकरे शेतकरी, शि.क.**

# दिघोरी उड्डाणपुलावर वाहतूक कोंडीत रुग्णवाहिका अडकली

**▸विदर्भ केसरी। नागपूर,**

दिघोरी उड्डाणपूल ते म्हाळगी नगर चौक परिसरात दररोज मोठ्या प्रमाणावर वाहतूक कोंडी होत आहे. आज सायंकाळी सुमारे ७ वाजता या कोंडीत एक रुग्णवाहिका अडकली, ज्यामुळे रुग्णाच्या जीवाला गंभीर धोका निर्माण झाला. वेळेवर वैद्यकीय उपचार न मिळाले असते, तर गंभीर अपघात घडू शकला असता.

म्हाळगी नगर ते मानेवाडा उड्डाणपुलाच्या सुरू असलेल्या बांधकामासह रस्त्यावर पडलेल्या मोठ्या खड्ड्यांमुळे हा परिसर सतत जाम झाला आहे. यामुळे नागरिकांना मोठा त्रास सहन करावा लागत असून, धुळीमुळे आरोग्याचा प्रश्नही निर्माण झाला आहे. काही ठिकाणी अपघातांमुळे निष्पाप



नागरिकांचे प्राण गेले असतानाही प्रशासन वेळेवर प्रतिक्रिया दाखवत नसल्याची संतप्त प्रतिक्रिया नागरिकांकडून व्यक्त होत आहे. Dighori flyover वाहतूक पोलिसांची उपस्थितीही दिसून आली नाही, ज्यामुळे परिस्थिती आणखी विस्कळीत झाली. नागरिक आता प्रश्न उपस्थित करत आहेत, "लोकांचे जीव गेल्यावरच प्रशासन जागे होणार का?" परिसरातील नागरिक तात्काळ उपाययोजना करून वाहतुकीस सुरळीतता आणण्याची मागणी करत आहेत.

## डॉ आशिष कोरेटी यांनी अन्नातून झालेल्या विषबाधीत आश्रम शाळेतील मुलाची भेट

**▶विदर्भ केसरी प्रतिनिधी : प्रल्हाद मेश्राम**

देसाईगंज : भामरागड तालुक्यातील लाहेरी येथील शासकीय आश्रम शाळेतील विद्यार्थ्यांना जेवणातून ५९ विद्यार्थ्यांना विषबाधा झाली, त्यापैकी कमलेश पुंगाटी या विद्यार्थ्यांची प्रकृती गंभीर असल्यामुळे त्याला नागपूर येथील एम्स रुग्णालयात गंभीर अवस्थेत भरती करण्यात आले. वजह फाउंडेशन चे संचालक डॉ. आशिषदादा कोरेटी यांना माहिती मिळताच तत्काळ नागपूर येथील एम्स रुग्णालय गाठून भरती असलेल्या मुलाची भेट घेऊन त्याच्या तब्येतीची आस्थेने विचारपूस केली. आणि त्याच्या नातेवाईकांसोबत चर्चा करून त्याना धीर देण्यात आले. त्या दरम्यान एम्स रुग्णालयाचे मुख्य कार्यकारी संचालक डॉ. प्रशांत जोशी सर, बालरोग विभागाचे प्राध्यापक व विभागप्रमुख डॉ. मीनाक्षी गिरीश मॅडम, डॉ. आकाश बँग , डॉ. उर्मिला धकाते मॅडम (एडिशनल प्रोफेसर), डॉ. अभिजीत चौधरी (सहयोगी प्राध्यापक), डॉ. शिखा जैन (सहयोगी प्राध्यापक) डॉ. हिमाली मेश्राम (पोटविकार तज्ञ) यांच्या सोबत विद्यार्थ्यांच्या तब्येतीबद्दल सविस्तर चर्चा करण्यात आली आणि विद्यार्थ्यांच्या तब्येतीकडे विशेष लक्ष्य ठेवण्याच्या सूचना देन्यात आले.

यासंदर्भात आदिवासी विकास विभाग नागपूर च्या अपर आयुक्त आयुषी सिंग याना विद्यार्थ्यांच्या तब्येतीबद्दल सविस्तर माहिती देण्यात आली आणि या घटनेला जबाबदार असणाऱ्या आश्रम शाळेतील अधीक्षक आणि कर्मचाऱ्यांवर योग्य ती कारवाई करावी अशी सूचना करण्यात आली.

# नांदगाव पेठ ग्रामसभेत वाद, सीईओ करणार चौकशी

## नागरिकांचा आरोप- सरपंच, ग्रामसेवकांनी उत्तरे दिली नाहीत; अधिकाऱ्यांचे म्हणणे- अनावश्यक प्रश्न होते

**▶विदर्भ केसरी प्रतिनिधी**

नांदगाव पेठ येथील ग्रामसभेत नागरिकांनी उपस्थित केलेल्या प्रश्नांची समाधानकारक उत्तरे न मिळाल्याने तणावाचे वातावरण निर्माण झाले. सरपंच आणि ग्रामपंचायत अधिकाऱ्यांनी सभेतून काढता पाय घेतल्याचा आरोप नागरिकांनी केला आहे. या प्रकरणी महसूल तंटामुक्त समितीचे अध्यक्ष प्रा. मोरेश्वर इंगळे यांनी जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी (सीईओ) संजिता महापात्र यांना निवेदन सादर करून चौकशीची मागणी केली आहे.

ग्रामसभा हे गावाच्या विकासासाठी महत्त्वाचे लोकशाही व्यासपीठ मानले जाते. या ग्रामसभेत सुमारे ४०० नागरिक उपस्थित होते. नागरिकांनी विविध विकासकामे, योजना आणि प्रशासकीय बाबींवर प्रश्न उपस्थित केले. मात्र, काही प्रश्नांवर स्पष्ट उत्तरे मिळाली नाहीत, असा नागरिकांचा आरोप आहे.

निवेदनानुसार, ग्रामसभा संपण्यापूर्वीच सरपंच कविता डांगे आणि ग्रामविकास अधिकारी हर्षदा बोंडे सभागृहातून बाहेर पडल्या. त्यामुळे उपस्थित नागरिकांमध्ये संभ्रम आणि नाराजी निर्माण झाली. सुमारे १३ हजार मतदार आणि ३० हजार लोकसंख्येचे प्रतिनिधित्व करणाऱ्या या ग्रामसभेतील या घटनेची सखोल चौकशी करून योग्य ती कारवाई करावी, अशी मागणी प्रा. मोरेश्वर इंगळे यांनी केली आहे. त्यांच्या निवेदनावर अनेक नागरिकांच्या स्वाक्षऱ्या आहेत. दुसरीकडे, ग्रामविकास अधिकारी हर्षदा बोंडे यांनी या आरोपांचे खंडन केले आहे. त्यांनी स्पष्ट केले की, ग्रामसभा उत्साहात पार पडली आणि नागरिकांच्या प्रश्नांना उत्तरे देण्यात आली. सभेचा मुख्य विषयही निकाली काढण्यात आला होता. मात्र, सभा संपल्यानंतर काही तरुणांकडून अनावश्यक प्रश्न विचारले जात असल्याने सरपंचांसह आपण कार्यालयात परतलो. ग्रामसभेतून काढता पाय घेतल्याचा आरोप चुकीचा असल्याचेही त्यांनी नमूद केले.



## संक्षीप्त

### ०२ फेब्रुवारी ला "जगद्गुरू श्री संत तुकाराम महाराज जयंती व स्नेहमिलन सोहळा" आयोजन...!

**▶विदर्भ केसरी प्रतिनिधी : विनोद सेलोटे**

सोमवार, दि. २ फेब्रुवारी २०२६ रोजी गडचिरोली येथे "जगद्गुरु श्री संत तुकाराम महाराज जयंती व स्नेह मिलन सोहळा " आयोजित करण्यात येत आहे. तरी या सोहळ्यास समाज बांधवांनी सहपरिवार उपस्थित राहण्याचे आवाहन कुनबि समाज बांधवांकडून करण्यात आले आहे.

स्थळ : कुणबी समाज भवन नियोजित जागा, कार्मेल स्कुल मागे, शिवमंदिर रोड, गडचिरोली सकाळी ८.०० वा. समाज बांधवांचे एकत्रिकरण सकाळी ९.०० वा. ध्वजारोहण सकाळी ९.३० वा. महापुरुषांच्या प्रतिमेला माल्यार्पण दुपारी २.०० वा. : मोफत आरोग्य तपासणी व रक्तदान शिबीर दुपारी ३.०० वा. : हळदी-कुंकू व महिलांकरीता विविध कार्यक्रम दुपारी ३.३० वा. : भजन संध्या सायं. ४.०० वा. : पालखी सोहळा-(मार्गे - समाज भवन नियोजित जागा-शिवाजी महाविद्याल-रेड्डी गोडावून चौक-चामोर्शी रोड-इंदिरा गांधी चौक-समाज भवन नियोजित जागा) सायं. ६.०० वा. : प्रबोधनपर कार्यक्रम वक्ते : मा. नितेश गोहणे सर (PSI) मा. राजश्री नितेश गोहणे सायं. ६.३० वा. सत्र २०२५ मधील इ. १० वी व १२ वी गुणवंत विद्यार्थी, शासकीय सेवेत रुजू झालेले कर्मचारी व नवनिर्वाचित नगरसेवकांचा सत्कार सोहळा (संपर्क - 9421730447/9404791259) सायं. ७.०० वा.:- स्नेहभोजनाचा कार्यक्रम







### "MPSC–UPSC कडे युवकांचे लक्ष वळवा, समाज बदलाची सुरुवात शिक्षणातूनच होईल : प्रा. अनिल होळी"

**▶विदर्भ केसरी प्रतिनिधी : प्रल्हाद मेश्राम**

देसाईगंज : राष्ट्रीय गोंडवाना महोत्सव तथा गोंडी सांस्कृतिक महोत्सवाचे आयोजन कोलासूर पेनठाणा ट्रस्ट गडबोरी यांच्या वतीने सिंदेवाही तालुक्यातील गडबोरी येथे उत्साहात पार पडले. या कार्यक्रमात प्रमुख मार्गदर्शक व स्पर्धा परीक्षा व करिअर मार्गदर्शक म्हणून प्रा. अनिल होळी यांनी आदिवासी समाजाच्या शैक्षणिक व प्रशासकीय सहभागाबाबत महत्त्वपूर्ण मार्गदर्शन केले. यावेळी बोलताना प्रा. अनिल होळी म्हणाले की, संविधान निर्मितीनंतर 75 ते 80 वर्षांचा कालावधी उलटून गेला असला तरीही आदिवासी समाजाला आरक्षणाचा संपूर्ण व अपेक्षित लाभ मिळालेला नाही. ज्या पद्धतीने समाजाचा सर्वांगीण विकास व्हायला हवा होता, तसा विकास आजही झालेला दिसून येत नाही. समाजात आजही उच्च शिक्षणाचे प्रमाण कमी असून औद्योगिक, प्रशासकीय व राजकीय क्षेत्रात आदिवासी समाजाला अपेक्षित प्रतिनिधित्व मिळालेले नाही, ही चिंतेची बाब असल्याचे त्यांनी नमूद केले. चंद्रपूर व गडचिरोली परिसरात पोलीस भरती व्यतिरिक्त MPSC, UPSC व इतर केंद्रीय व राज्यस्तरीय स्पर्धा परीक्षांबाबत पुरेशी जागरूकता नसल्यामुळे युवकांचे ध्येय मर्यादित राहते, असे स्पष्ट करत त्यांनी समाजातील उच्चशिक्षित युवक, शिक्षक व गावातील वरिष्ठांनी पुढाकार घेऊन विद्यार्थ्यांमध्ये मोठ्या स्पर्धा परीक्षांविषयी माहिती व प्रेरणा निर्माण करण्याचे आवाहन केले. या कार्यक्रमाचे उद्घाटन मा. वामनजी वेलादी, ध्वजारोहण देवेंद्रजी तलांडे यांच्या हस्ते पार पडले. मार्गदर्शनासाठी डॉ. प्रकाश वट्टी सर, घनश्यामजी पेंदाम सर उपस्थित होते. कार्यक्रमाला कैलासभाऊ कुंभरे, नामदेवरावजी काटेकर, सुखदेवजी मेश्राम, पात्रेजी, चिचमलकरजी यांची प्रमुख उपस्थिती होती. कार्यक्रमाचे प्रास्ताविक कोलासूर पेनठाणा ट्रस्टचे अध्यक्ष मुरलीधरजी मडावी यांनी केले. यावेळी मोठ्या संख्येने आदिवासी समाज बांधवांसह इतर समाजातील मान्यवर नागरिक उपस्थित होते. संपूर्ण कार्यक्रम उत्साहपूर्ण वातावरणात यशस्वीरित्या पार पडला.

# मूर्तिजापूरात लोकनेते अजितदादा पवार यांना जनसागराकडून भावपूर्ण श्रद्धांजली

मूर्तिजापूर : महाराष्ट्राचे लाडके उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांच्या निधनामुळे संपूर्ण राज्यावर शोककळा पसरली असतांना, आज १ फेब्रुवारी २०२६ रोजी मूर्तिजापूर येथे विविध संघटना व पक्षांच्या वतीने अत्यंत भावूक वातावरणात श्रद्धांजली अर्पण करण्यात आली. स्थानिक भगतसिंग चौक, बायपास येथे शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्ष, संभाजी ब्रिगेड, मराठा सेवा संघ व वीर भगतसिंग मित्र मंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने या शोकसभेचे आयोजन करण्यात आले होते. अश्रूंच्या धारा व 'अजितदादा अमर रहे'चा जयघोष या कार्यक्रमाचे आयोजन शिवसेना तालुका प्रमुख गजानन चौधरी व संभाजी ब्रिगेडचे अमरावती विभागीय कार्याध्यक्ष संजय गुप्ता यांनी केले होते. सभेच्या सुरुवातीला दादांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. यावेळी उपस्थित



अनेक पदाधिकाऱ्यांच्या डोळ्यांत अश्रू तरळले. "अजितदादा अमर रहे" "असा नेता पुन्हा होणे नाही" अशा भावनांनी परिसर हेलावून गेला होता. प्रमुख वक्त्यांच्या भावना श्रद्धांजली सभेत शिवसेना जिल्हा उपप्रमुख मा. चंद्रकांत तिवारी, तालुका प्रमुख गजानन चौधरी , संजय गुप्ता यांनी दादांच्या धडाडीच्या कार्यपद्धतीवर आणि महाराष्ट्राच्या विकासातील त्यांच्या योगदानावर प्रकाश टाकला. राष्ट्रवादीचे नेते श्रीकृष्ण बोळे , ॲड. भूषण काळे आणि श्रीधर कांबे यांनीही त्यांच्या आठवणींना उजाळा देत श्रद्धांजली वाहिली. उपस्थित मान्यवर या शोकसभेला तालुक्यातील राजकीय आणि सामाजिक क्षेत्रातील अनेक दिग्गज उपस्थित होते, ज्यात प्रामुख्याने,

विनायक गुल्हाने शहर प्रमुख, अरविंद तायडे शेतकरी सेना तालुका प्रमुख उज्ज्वल ठाकरे, सौरभ हुतके.

अमोल तांबडे, जगदेव छबिले, बंडू लांडे, बाळासाहेब खांडेकर, राहूल तिडके, विकास लकडे. निखिल गुप्ता, अभिषेक अढाऊ, निरंजन गवई, तुषार दाभाडे, पियुष उमाळे आणि मोठ्या संख्येने शिवसैनिक व संभाजी ब्रिगेडचे कार्यकर्ते उपस्थित होते. मूर्तिजापूर तालुक्याने आज आपल्या एका लाडक्या नेत्याला अत्यंत जड अंतःकरणाने निरोप दिला.

# अकोल्यातून महाराष्ट्र शेतकरी संघटनेची स्थापना

## कास्तकार व कृषी विकासासाठी कटिबद्ध : पूर्णाजी खोडके

**▶विदर्भ केसरी प्रतिनिधी**

अकोला : राज्यातील शेतकरी, शेतमजूर व ग्रामीण भागातील सर्वसामान्य जनतेच्या कृषीविषयक ज्वलंत प्रश्नांना वाचा फोडण्यासाठी महाराष्ट्र शेतकरी संघटनेची अकोल्यातून अधिकृत स्थापना करण्यात आली असून, शेतकरी व कृषी विकासासाठी संघटना कटिबद्ध असल्याचे प्रतिपादन संघटनेचे अध्यक्ष पूर्णाजी खोडके यांनी केले. रविवारी अकोला येथील शासकीय विश्रामगृहात आयोजित पत्रकार परिषदेत महाराष्ट्र शेतकरी संघटनेचे ध्येय, धोरणे व आगामी कृती कार्यक्रम जाहीर करण्यात आले. यावेळी संघटनेचे नूतन सचिव सुगत भटकर यांची उपस्थिती होती. यावेळी बोलताना पूर्णाजी खोडके म्हणाले की, सरकार शेतकरी व शेतमजुरांच्या मूलभूत समस्या सोडवण्यात अपयशी ठरले असून, कृषी क्षेत्राचा साचेबद्ध विकास होण्याऐवजी शेतकऱ्यांची आर्थिक, सामाजिक व शैक्षणिक पिळवणूक वाढत आहे. या अन्यायाविरोधात राज्यभरात





संघटना आक्रमक आंदोलन छेडणार आहे. महाराष्ट्र शेतकरी संघटना शेतकऱ्यांच्या सर्व समस्यांवर ठोस उपाययोजना करण्यासाठी कार्यरत राहणार असून, उत्पादन खर्चावर आधारित हमीभाव, कर्जमुक्ती व कर्जमाफी, पिकविमा नुकसानभरपाई, दुष्काळ, अतिवृष्टी, गारपीट व नैसर्गिक आपत्तीग्रस्त शेतकरी कुटुंबांना न्याय मिळवून देण्यासाठी संघटना प्रभावी संघर्ष करणार आहे. तसेच ग्रामीण व शहरी भागात पाणी, वीज, रस्ते, आरोग्य व शिक्षण सुविधा उपलब्ध व्हाव्यात, यासाठी शासनावर दबाव आणण्यात येणार असून, शेतकरी व सार्वजनिक प्रश्न शासन व प्रशासनासमोर ठोसपणे मांडले जातील, असेही त्यांनी स्पष्ट केले. संघटनेच्या कृती कार्यक्रमांतर्गत शेतमजूर, महिला, अल्पभूधारक शेतकरी व गरीब घटकांच्या न्यायहक्कासाठी संघर्ष, तसेच ग्रामीण भागात तरुणांसाठी रोजगार व स्वयंरोजगार निर्मितीसाठी विविध उपक्रम राबविण्यात येणार आहेत. लवकरच राज्यस्तरीय व जिल्हास्तरीय कार्यकारिणी गठीत करून संघटनेचे काम प्रभावीपणे सुरू करण्यात येणार असल्याचेही सांगण्यात आले. या पत्रकार परिषदेस यासीन खान, विजय इंगळे, भारत भटकर, सिद्धू खरे, अभी मोहोड, धम्मा सरदार, मधुकर बोपटे, किशोर चक्रे यांच्यासह कार्यकर्ते उपस्थित होते.

# मान्यवरांचे सूर आदर्श महाविद्यालयात तीन दिवसीय व्यक्तिमत्व विकास शिबिराची यशस्वी सांगता

**▶विदर्भ केसरी प्रतिनिधी : प्रल्हाद मेश्राम**

देसाईगंजः स्थानिक आदर्श कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयातील विद्यार्थी विकास विभागाच्या वतीने २८ जाने. ते ३० जाने. २०२६ दरम्यान तीन दिवसीय व्यक्तिमत्व विकास शिबिराचे आयोजन करण्यात आले. शिबिराचे उद्घाटन डॉ. शंकर कुकरेजा, माजी प्राचार्य तथा सदस्य नू. शि. प्र. मंडळ, देसाईगंज यांचे हस्ते करण्यात आले. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. श्रीराम गहाणे यांचे अध्यक्षतेखाली संपन्न झालेल्या या उद्घाटन कार्यक्रमाला मुख्य मार्गदर्शक म्हणून मा. दामोदर शिंगाडे, प्राचार्य, आदर्श इंग्लिश हायस्कूल तथा कनिष्ठ महाविद्यालय होते तर प्रमुख अतिथी म्हणून डॉ. विठ्ठल चव्हाण, विद्यार्थी विकास अधिकारी प्रामुख्याने मंचावर उपस्थित होते. उद्घाटक स्थानावरून बोलताना डॉ. शंकर कुकरेजा यांनी सकारात्मक व नकारात्मक विचार यामधील फरक समजावून सांगितले व जे चांगले आहे त्याचा स्वीकार करावा व जीवनात यशस्वी व्हावे असा मोलाचा सल्ला दिला. प्राचार्य दामोदर शिंगाडे यांनी विद्यार्थ्यांनी न गोंधळता जीवनात योग्य निर्णय घ्यावे, जेणेकरून योग्य दिशेने मार्गक्रमण करून यश संपादित करता येईल असे अमुल्य मार्गदर्शन व्यक्त केले.

शिबिराच्या दुसऱ्या दिवशी श्री. लक्ष्मण मेश्राम, संचालक, इन्स्पायर करिअर अकॅडमी, ब्रह्मपुरी यांनी "मी होणार प्रशासकीय अधिकारी" या विषयावर विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. या सोबतच डॉ. निहार बोदेले, अर्थशास्त्र विभाग प्रमुख यांनी "स्वयंरोजगार समृद्धीचा एक सशक्त माध्यम" या विषयावर मार्गदर्शन केले. दुसऱ्या दिवशीच्या सत्राचे अध्यक्ष प्रा. डॉ. एच. बी. धोटे यांनी सुद्धा यथायोग्य मार्गदर्शन केले.

३० जानेवारीला शिबिराचे समारोपीय कार्यक्रमाचे प्राचार्य, डॉ. श्रीराम गहाणे यांचे अध्यक्षतेखाली घेण्यात आला. यावेळी मुख्य मार्गदर्शक म्हणून प्रा. डॉ. नरेंद्र आरेकर, गो. मु. महाविद्यालय, कुरखेडा प्रामुख्याने उपस्थित होते. प्रा. डॉ. नरेंद्र आरेकर "व्यक्तिमत्त्वाचे विविध पैलु" या विषयावर विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करतांना म्हणाले की, व्यक्तिमत्व विकसित करण्यासाठी विद्यार्थ्यांनी सतत प्रयत्नशील असावे.

आपणच आपल्या जीवनाचे शिल्पकार आहोत याची जाणीव ठेवावी. याप्रसंगी अध्यक्ष डॉ. श्रीराम गहाणे म्हणाले की व्यक्तिमत्व विकास ही





एक निरंतर चालणारी प्रक्रिया आहे. ज्याप्रमाणे निसर्गामध्ये सातत्याने बदल होतात तसेच बदल मानवाच्या जीवनामध्ये सुद्धा होत असतात. यशस्वी जीवन जगण्यासाठी विद्यार्थ्यांनी सकारात्मक दृष्टिकोन अंगीकारावा. प्रास्ताविक डॉ. विठ्ठल चव्हाण, विद्यार्थी विकास अधिकारी यांनी केले. सूत्रसंचालन डॉ. राजू चावके यांनी तर आभार डॉ. निलेश हलामी यांनी मानले. शिबिर यशस्वी करण्यासाठी महाविद्यालयातील सर्व शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांनी सहभाग घेतला. या शिबिरात १६५ विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला.

# केंद्राचा अर्थसंकल्प 'सबका साथ सबका विकास' व सर्व 'समावेशक'

## डॉ. प्रणय खुणे, जिल्हा उपाध्यक्ष भारतीय जनता पार्टी

**▶विदर्भ केसरी प्रतिनिधी : फुलचंद वाघाडे**

गडचिरोली : केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी आज संसद



भवनात सादर केलेला केंद्रीय अर्थसंकल्प हा देशाच्या सर्वांगीण विकासाचा केंद्रबिंदू असून, या अर्थसंकल्पातून शेतकरी, महिला, आदिवासी तसेच देशातील ग्रामीण व औद्योगिक क्षेत्राला क्रांतिकारी नवसंजीवनी देणारी आहे, अशी प्रतिक्रिया भारतीय जनता पार्टी जिल्हा उपाध्यक्ष डॉ.प्रणय भाऊ खुणे यांनी व्यक्त केले. या "सबका साथ सबका विकास" अर्थसंकल्पात शेतकरी बांधवांसोबतच पशुपालन व मत्स्यव्यवसायाला तसेच अनेक उद्योगांना विशेष प्रोत्साहन देण्यात आले असून, ग्रामीण अर्थव्यवस्था अधिकाअधिक सक्षम करण्याच्या दृष्टीने सरकारची भूमिका स्पष्ट होते. नागरिकांच्या सर्वांगीण गरिबी उत्थानासाठी केंद्र सरकार नेहमीच सकारात्मक पावले उचलत असून, यावर्षी त्यांच्यासाठी आणखी काही नवीन व प्रभावी योजना उपाययोजना राबविण्यात येणार असल्याचे संकेत या अर्थसंकल्पातून दिसून येत आहे. औद्योगिक विकासाच्या माध्यमातून स्टील हबच्या दिशेने वेगाने वाटचाल करत असलेल्या गडचिरोली जिल्ह्यासाठी हाअर्थसंकल्प अतिशय महत्वाचे असून, राज्यातील नवीन औद्योगिक कॉरिडॉरच्या माध्यमातून स्थानिक युवकांना मोठ्या प्रमाणात रोजगाराच्या संधी उपलब्ध होतील तसेच सामान्य नागरिकांसाठी नवीन व्यवसायाची दारे राज्यात प्रामुख्याने गडचिरोली जिल्ह्यात खुली होतील, महिला सक्षमीकरणाला अधिक बळ देणाऱ्या तरतुदी, व पायाभूत सुविधा विकासाला मिळणारी चालना आणि दीर्घकालीन आर्थिक स्थैर्य साधणाऱ्या उपाय योजनांमुळे देशाच्या विकासाला नवी दिशा मिळेल. एकूणच हा अर्थसंकल्प 'विकसित भारत' संकल्पनेचा स्वप्न साकार करणारा असून, देशाचा समतोल व परिपूर्ण सर्वसमावेशक विकास निश्चितच साधला जाईल, यात कोणतीच शंका नाही, असे स्पष्ट विचार संचालक डॉ. खुणे कन्स्ट्रक्शन अँड कंपनी व एल. एल. डोंगरवार कन्स्ट्रक्शन अँड कंपनी जिल्हा गडचिरोली व भाजपा जिल्हा उपाध्यक्ष,राष्ट्रीय मानवाधिकार संघटनेचे प्रदेशाध्यक्ष डॉ. प्रणय खुणे यांनी व्यक्त केले.

# आदिवासी शिक्षण व संस्कृती जतनासाठी पुढाकार

## महाराष्ट्रातील पहिल्या गोंडी माध्यम शाळेला श्री फाउंडेशनकडून शैक्षणिक पुस्तकांची भरीव मदत!

**▶विदर्भ केसरी प्रतिनिधी : फुलचंद वाघाडे**

गडचिरोली : महाराष्ट्रात गोंडी भाषेतून शिक्षण देणारी पहिली शाळा म्हणून ओळख असलेल्या गडचिरोली जिल्ह्यातील मोहगाव येथील शाळेला शैक्षणिक पुस्तकांची आवश्यकता असल्याची माहिती मिळताच श्री फाउंडेशनने सामाजिक बांधिलकी जपत तात्काळ मदतीचा हात पुढे केला. फाउंडेशनच्या वतीने शाळेला आवश्यक शैक्षणिक पुस्तके व साहित्य प्रदान करण्यात आले. या उपक्रमाअंतर्गत श्री फाउंडेशनचे पदाधिकारी व सदस्यांनी शाळेला प्रत्यक्ष भेट देत विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य सुपूर्द केले. यावेळी विद्यार्थ्यांशी संवाद साधून त्यांच्या शैक्षणिक प्रवासाबाबत जाणून घेण्यात आले. गोंडी भाषेतील





अध्यापन पद्धत, शिक्षकांची मेहनत आणि विद्यार्थ्यांचा उत्साह पाहून फाउंडेशनचे सर्व सदस्य भारावून गेले. या भेटीदरम्यान विद्यार्थ्यांसोबत सामूहिक भोजनाचा आनंद घेण्यात आला. तसेच विद्यार्थ्यांनी सादर केलेल्या पारंपरिक गोंडी नृत्याने उपस्थितांचे मन जिंकले. या सांस्कृतिक सादरीकरणामुळे आदिवासी परंपरा, संस्कृती आणि एकतेचा सुंदर अनुभव सर्वांना लाभला. या कार्यक्रमास श्री फाउंडेशनचे अध्यक्ष इंजि. पायल श्रीकांत कोडापे, उपाध्यक्ष भाग्यश्री गडमावर यांच्यासह मंजू कोडापे, जिजाबाई कोडापे, सरिता चौधरी, प्रिया देशमुख, संध्या पवार, विद्या कांबळे, सोनाक्षी अवसरे, वैशालीताई मुंघाटे, प्रेमीला नवघरे, चेतन म्हशाखेत्री, प्रलय चहांदे, प्रकाश कोडापे आणि मामिता मडावी आदी मान्यवर उपस्थित होते. गोंडीसारख्या आदिवासी भाषेतून शिक्षण देणाऱ्या या शाळेला मिळालेली मदत केवळ शैक्षणिक दृष्टिकोनातूनच नव्हे, तर आदिवासी भाषा व संस्कृतीच्या जतनासाठीही अत्यंत महत्त्वाची असल्याचे मत यावेळी उपस्थितांनी व्यक्त केले. आदिवासी विद्यार्थ्यांना त्यांच्या मातृभाषेतून शिक्षण मिळणे ही काळाची गरज असून अशा उपक्रमांमुळे शिक्षणाचा दर्जा अधिक उंचावेल, असा विश्वास व्यक्त करण्यात आला. भविष्यातही आदिवासी व दुर्गम भागातील शिक्षणासाठी सातत्याने कार्य करत राहण्याचा निर्धार श्री फाउंडेशनच्या वतीने यावेळी व्यक्त करण्यात आला.

## पुणे शहरात तीन वेगवेगळ्या अपघातात तिघांचा मृत्यू : मृतांमध्ये महिलांचा समावेश

पुणे शहरात तीन वेगवेगळ्या अपघातांमध्ये दोन महिलांसह तिघांचा मृत्यू झाला आहे. उत्तमनगर, औंध आणि नगर रस्ता परिसरात या घटना घडल्या. पोलिसांनी संबंधित चालकांविरोधात गुन्हे दाखल केले आहेत. उत्तमनगर येथील एनडीए रस्त्यावर दुचाकी घसरल्याने शर्ली एन. अँथोनी (वय ३७, रा. उत्तमनगर) या सहप्रवासी महिलेचा मृत्यू झाला. ही घटना २ जानेवारी रोजी दुपारी पावणेतीनच्या सुमारास भाजी मंडई परिसरात घडली. भरधाव दुचाकी घसरल्याने शर्ली यांच्या डोक्याला गंभीर दुखापत झाली आणि उपचारादरम्यान त्यांचा मृत्यू झाला. या प्रकरणी पोलीस कर्मचारी सचिन गायकवाड यांनी उत्तमनगर पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. पोलिसांनी शर्ली यांच्या पतीवर, भरधाव दुचाकी चालवून पत्नीच्या मृत्यूस जबाबदार ठरल्याप्रकरणी गुन्हा दाखल केला आहे. पोलीस उपनिरीक्षक चेतन धनवडे या प्रकरणाचा तपास करत आहेत.

औंध रस्त्यावर पीएमपी बसच्या धडकेत चंद्रकला ज्ञानोबा वाव्हाळ (वय ७५, रा. औंध) या पादचारी ज्येष्ठ महिलेचा मृत्यू झाला. ३० जानेवारी रोजी रात्री सव्वानऊच्या सुमारास चंद्रकला वाव्हाळ गणेशखिंड रस्त्याने जात असताना, औंध येथील केंद्रीय विद्यालयासमोर रस्ता ओलांडत होत्या. त्याचवेळी भरधाव पीएमपी बसने त्यांना धडक दिली, यात त्यांचा मृत्यू झाला. प्रभावती भोसले (वय ७४, रा. औंध) यांनी चतु:श्रृंगी पोलीस ठाण्यात या प्रकरणी फिर्याद दिली आहे. पोलिसांनी पीएमपी बस चालकाविरुद्ध गुन्हा दाखल केला असून, पोलीस उपनिरीक्षक मनीषा जाधव पुढील तपास करत आहेत.

## संक्षीप्त



### नगर पंचायत कुरखेडा येथील ग्राउंडवर पोलीस भरती शारीरिक परीक्षा

**▸विदर्भ केसरी प्रतिनिधी : फुलचंद वाघाडे**

कुरखेडा : पोलीस भरतीत पात्र होण्याकरीता बौद्धिक परीक्षे सोबतच शारिरिक कवायतीत सूद्धा उत्तीर्ण व्हावी लागते सदर परिक्षेचा अनूभव व सराव व्हावा याकरीता परीसरातील पोलीस भरतीची तयारी करणाऱ्या उमेदवाराकरीता पोलीस स्टेशन कुरखेडा यांचा वतीने पोलीस भरती शारीरिक सराव परिक्षेचे आयोजन नगर पंचायत कुरखेडा येथील ग्राउंड येथे करण्यात आले होते. पोलीस स्टेशन कुरखेडा यांच्या पुढाकारातून दि. 31/01/2026 रोजी आयोजित या शारीरिक सराव परिक्षेत परीसरातील ८० इच्छुक उमेदवारांनी सहभाग नोंदवून शारीरिक परीक्षेचा प्रत्यक्ष अनूभव घेतला. यापूर्वी सूद्धा पोलीस स्टेशन कुरखेड्याच्या वतीने एकूण 7 वेळा सराव परीक्षेचे आयोजन करण्यात आलेले आहे. सदर उपक्रमा मूळे प्रत्येक्ष पोलीस भरती शारीरिक परिक्षेत उमेदवाराना मोठी मदत होणार आहे. सदर उपक्रम उपविभागीय पोलिस अधिकारी रवींद्र भोसले व ठाणेदार महेन्द्र वाघ यांच्या मार्गदर्शनात पोलीस उपनिरीक्षक संदिप कुमार ताराम, पोलीस उपनिरीक्षक दयानंद भोंबे, महिला पोलीस उपनिरीक्षक शीतल अवचार, पोलीस हवालदार मुखरू नेवारे, पोलीस हवालदार राजकुमार ढोरे, पोलीस शिपाई नरसिंग कोरे, स्वप्नील महारे, सुजित टांगले, राकेश येळणे, सोनल खेवले, नंदकिशोर मेश्राम, महिला पोलिस शिपाई प्रितल इप्पर, दिपाली तलांडे, राजश्री नाकतोडे व पल्लवी दोनारकर यांच्या पथकाकडून राबविण्यात आला.



### ग्रामीण भागातील खेळाडूंना प्रोत्साहन देण्यास राष्ट्रीय मानवाधिकार संघटना कटिबद्ध : राष्ट्रीय मानवाधिकार संघटना जिल्हा गडचिरोली

**▸विदर्भ केसरी प्रतिनिधी : फुलचंद वाघाडे**

चामोर्शी : दिनांक 1 फेब्रुवारी 2026 रोजी चामोर्शी तालुक्यातील नवेगाव ( रै ) येथे शिवछत्रपती शिवाजी महाराज क्रीडा मंडळ सुभाष नगर नवेगाव (रै) यांच्या सौजन्याने भव्य रबरी बॉल अंडरआर्म क्रिकेट सामन्याचे आयोजन करण्यात आले या आयोजना निमित्त राष्ट्रीय मानवाधिकार संघटना च्या वतीने संघटनेला रबरी बॉल अंडरआर्म क्रिकेट सामना आयोजन करण्यासाठी राष्ट्रीय मानवाधिकार संघटनेचे प्रदेशाध्यक्ष डॉ. प्रणय खुणे यांच्या वतीने राष्ट्रीय मानवाधिकार संघटनेचे जिल्हाध्यक्ष रमेश अधिकारी व जिल्हा संघटन नेते प्रवीण गेडाम यांचे हस्ते आर्थिक मदत केली यावेळी प्रामुख्याने मंडळाचे पदाधिकारी कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. उपस्थितांना मार्गदर्शन करताना जिल्हाध्यक्ष रमेश अधिकारी यांनी सांगितले ग्रामीण भागातील विविध खेळांना प्रोत्साहन देण्यासाठी राष्ट्रीय मानवाधिकार संघटना कटिबद्ध आहे. यावेळी मंडळाचे अध्यक्ष राजेश ईनमवार, उपाध्यक्ष विशाल देउरमले, सचिव अमर आगरे, सहसचिव आकाश गेडाम, कर्णधार लोकप्रिय भांडेकर, चेतन देऊरमले, अधिकारी, कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# धानो-यातील तालुका क्रीडा संकुलाचे निकृष्ट काम उघड

## बांधकाम संथगतीने, खेळाडू सरावाविना,चौकशीकरीता तहसीलदारांकडे तक्रार...!



**▸विदर्भ केसरी प्रतिनिधी : विनोद सेलोटे**

धानोरा : धानोरा शहरात मंजूर झालेल्या तालुका क्रीडा संकुलाचे बांधकाम निकृष्ट दर्जाचे असून, काम अत्यंत संथगतीने किंवा पूर्णतः थांबलेल्या अवस्थेत आहे. खेळाडूंसाठी उभारण्यात येणारे हे संकुल प्रत्यक्षात 'थंड बस्त्यात' पडल्याने सदर बांधकामाची सखोल चौकशी करण्याची मागणी तहसीलदारांकडे सादर केलेल्या तक्रारीतून करण्यात आली आहे. तालुकास्तरावर दर्जेदार खेळाडू घडावेत, त्यांना मैदान, धावपट्टी व आवश्यक सोयी-सुविधा एकाच छताखाली मिळाव्यात, या उद्देशाने या क्रीडा संकुलाच्या कामाला सुरुवात झाली होती.

### खेळाडू मैदानाविना, सराव रस्त्यावर.!

■ धानोरा परिसरातील युवकांमध्ये खेळाची प्रचंड ओढ आहे. मात्र मैदानाअभावी अनेक खेळाडूंना रस्त्यावर किंवा मिळेल त्या जागेत सराव करावा लागत आहे. क्रीडा संकुल वेळेत पूर्ण झाले असते, तर खेळाडूंना मोठा दिलासा मिळाला असता, असे तक्रारीत नमूद करण्यात आले आहे. त्यामुळे क्रीडा संकुलाच्या निकृष्ट कामाची चौकशी होऊन दोषींवर कारवाई केली जाणार का नाही, याकडे आता संपूर्ण तालुक्याचे व क्रीडा प्रेमींचे लक्ष लागले आहे.

मात्र, सुरुवातीच्या टप्प्यानंतरच या प्रकल्पाला जणू ग्रहण लागले असून आजही संकुलाचे काम अपूर्ण आहे. राज्य सरकारच्या धोरणानुसार जिल्हा व तालुकास्तरावर क्रीडा संस्कृती जोपासण्यासाठी निधीची तरतूद केली जाते. परंतु धानोऱ्यात हे धोरण कागदावरच उरल्याचे चित्र दिसत आहे. निधीअभावी काम रखडले की प्रशासकीय उदासीनतेमुळे, असा सवाल क्रीडाप्रेमींमधून उपस्थित होत आहे.

तक्रारीनुसार, गेल्या दोन वर्षांपासून क्रीडा संकुलाचे काम सुरु आहे. काम सुरु करण्यापूर्वी त्या ठिकाणी क्रिकेटचे दोन पिच (नेट पिच व ओपन सिमेंट पिच) तसेच व्हॉलीबॉल नेटसह क्रीडांगण उपलब्ध होते. ठेकेदारांनी हे सर्व नव्याने व अधिक दर्जेदार स्वरुपात उभारून देण्याचे आश्वासन दिले होते. मात्र, एक वर्ष उलटूनही नियोजित लेव्हलनुसार काम पूर्ण झालेले नाही. क्रिकेटचे सिमेंट नेट पिच व ओपन पिच तयार करण्यातही दिरंगाई होत असल्याचा आरोप आहे. दरम्यान GDPL (लॉयड्स मेटल्स अँड एनर्जी लिमिटेडद्वारे संचालित) स्पर्धेत धानोरा संघ सहभागी असतांनाही क्रीडांगणाच्या अभावामुळे क्रिकेट सराव करता येत नसल्याचे खेळाडूंनी नमूद केले आहे.

त्यामुळे तातडीने दखल घेऊन योग्य कारवाई करण्याची मागणी करण्यात आली आहे. ही तक्रार भूषण भैसारे, देवनंद ठाकरे, प्रेमदास पाटणकर, दीपक करकाडे, संघम उंदिवाडे, आकाश पुडो, निशांत सोनटक्के, प्रणय मांदाळे, वैभव ठाकर, मोहित आलम, नमन महाडोरे, देवेंद्र बढई, मंथन शेंडे, तुषार उसेंडी, अभिषेक गावडे, राम झंझाड, हिमांशु धनगुन, स्वागत रामटेके, लोकेश कपुरडेहरिया, गणेश बारसागडे, पवन मडावी, शुभम नैताम, सुशील श्रीपदवार, सैरभ श्रीपदवार, चंदन दुर्गावासी, भूषण मेश्राम, प्रशांत कोडाप, राहुल दिवटे, नकुल बारीकर, कार्तीक लाडे, दीपक पद, निखिल मेश्राम, रोशन टेकाम, यश कुमरे, हिमांशु उईके आदी खेळाडू व क्रीडाप्रेमींनी संयुक्तपणे दिली आहे.







## बंगाली समाजाच्या सर्वांगीण विकासासाठी कटीबद्ध

### डॉ. प्रणय खुणे प्रदेश अध्यक्ष राष्ट्रीय मानवाधिकार संघटना!.

**▸विदर्भ केसरी प्रतिनिधी : फुलचंद वाघाडे**

घोट / चामोर्शी :- दिनांक 30 जानेवारी 2026 रोजी घोट जवळील सिमूलतला येथील श्री, राधा गोविंद मंदिर येथे आजपासून दरवर्षी प्रमाणे आयोजित महानाम यज्ञ संकीर्तन कार्यक्रमास भव्य शुभारंभ झाले. उपस्थितांना राष्ट्रीय मानवाधिकार संघटना प्रदेश अध्यक्ष डॉ. प्रणय खुणे यांनी मार्गदर्शन केले व सांगितले बंगाली समाजाच्या सर्वांगीण विकासासाठी राष्ट्रीय मानवाधिकार संघटना कटीबद्ध आहे. व आगामी काळात राष्ट्रीय मानवाधिकार संघटनेच्या वतीने बंगाली समाजाच्या विविध प्रलंबित समस्यांना घेऊन विराट जनआंदोलन करण्यात येईल. प्रलंबित मागण्या व समस्या शासन दरबारी मांडण्यात येईल असे प्रतिपादन केले. यावेळी सर्व ग्रामस्थांच्या वतीने डॉ. खुणे यांना पिवळा सदरा कुर्ता भेट देण्यात आले पगडी बांधून सन्मान करण्यात आला व सर्व नागरिक व महिला भगिनी यांच्या हरेराम हरेकृष्ण हरेकृष्ण, राधे, राधे जयघोष सोबत मेणबत्ती आणि दिव्याची आरती घेऊन संपूर्ण मंदिर परिक्रमा केला, यावेळी राधे नाम, हरेराम, हरे कृष्ण, हरेराम, या संपूर्ण नावाने संपूर्ण सिमूलतला ग्राम दुमदुमला मंदिर समितीच्या वतीने संपूर्ण ग्रामस्थांसाठी व पंचक्रोशीतील नागरिकांसाठी भव्य महाप्रसादाचा आयोजन करण्यात आला होता यावेळी येथील मंदिर कमेटी पदाधिकारी कार्यकर्ते व प्रामुख्याने शामल दास, तपन माझी व अन्य कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते व राष्ट्रीय मानवाधिकार संघटनेचे जिल्हा अध्यक्ष रमेश अधिकारी जिल्हा उपाध्यक्ष किशोर कुंडू व संगठन नेते प्रवीण गेडाम व मान्यवर तथा गावकरी पदाधिकारी कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## मौशीखांबच्या अमोलच्या काष्ठशिल्पांना राष्ट्रीय नेतृत्वाची सलामी

**▸विदर्भ केसरी प्रतिनिधी : मंगेश सहारे**

मौशीखांब : जंगलातील टाकाऊ, निष्प्रयोजन समजल्या जाणाऱ्या लाकडातून कलाकृतींची नवी दुनिया उभारत मौशीखांब येथील काष्ठशिल्पकार अमोलने ग्रामीण कलेला थेट राजधानीपर्यंत पोहोचवले आहे. पर्यावरण संवर्धनाचा ठोस संदेश देणारी अमोलची काष्ठशिल्पकला आज दिल्ली–मुंबईसारख्या महानगरांमध्ये चर्चेचा विषय ठरत असून राष्ट्रीय पातळीवर त्याची दखल घेतली जात आहे. जंगलात पडून राहिलेले, कुजण्याच्या मार्गावर असलेले किंवा टाकाऊ ठरलेले लाकूड गोळा करून त्यातून कलात्मक शिल्प साकारण्याचा अभिनव प्रयोग अमोल करत आहे. या कलेसाठी एकही झाड तोडले जात नाही, ही बाब पर्यावरणप्रेमींसाठी आशादायी ठरत आहे. अमोलच्या शिल्पांमध्ये निसर्ग, वन्यजीवन, ग्रामीण संस्कृती आणि मानवी भावनांचे प्रभावी दर्शन घडते. दिल्ली व मुंबई येथे आयोजित विविध कला व सांस्कृतिक महोत्सवांमध्ये अमोलच्या काष्ठशिल्पांनी प्रेक्षकांचे विशेष लक्ष वेधले. या महोत्सवांदरम्यान महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस तसेच केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी अमोलच्या कलेचे विशेष कौतुक केले. जंगलातील टाकाऊ लाकडातून साकारलेली ही कला निसर्गसंवर्धनाचा आदर्श नमुना असल्याचे मत मान्यवरांनी व्यक्त केल्याने अमोलच्या कार्याला राष्ट्रीय स्तरावर नवी ओळख मिळाली आहे. ग्रामीण भागातून आलेली कला केवळ शहरांपुरतीच नव्हे, तर राष्ट्रीय व्यासपीठावरही पोहोचू शकते, हे अमोलने आपल्या कलेतून सिद्ध करून दाखवले आहे. त्याच्या या यशामुळे मौशीखांबसारख्या ग्रामीण भागालाही एक नवी ओळख मिळत असून स्थानिक युवकांसाठी प्रेरणादायी उदाहरण निर्माण झाले आहे. आज वाढती जंगलतोड, पर्यावरणाचा ऱ्हास आणि प्रदूषणाच्या पार्श्वभूमीवर अमोलसारख्या कलाकारांचे कार्य समाजासाठी दिशादर्शक ठरत आहे. "टाकाऊतून टिकाऊ" ही संकल्पना प्रत्यक्षात उतरवत अमोलची काष्ठशिल्पकला निसर्ग जपण्याचा आणि कलेतून रोजगारनिर्मितीचा प्रभावी मार्ग दाखवत आहे.





## महागाई कमी करण्यासाठी कोणतीही ठोस तरतूद नाही ; जनतेची फसवणूक

**▸विदर्भ केसरी प्रतिनिधी : फुलचंद वाघाडे**



गडचिरोली :- केंद्रीय बजेटमधून महागाई कमी होईल व सर्वसामान्य नागरिकांना दिलासा मिळेल, अशी अपेक्षा असताना सरकारने पुन्हा एकदा जनतेची घोर निराशा केली आहे. पेट्रोल, डिझेल, घरगुती गॅस, अन्नधान्य तसेच इतर जीवनावश्यक वस्तूंचे दर सातत्याने वाढत असताना व डॉलरच्या तुलनेत रुपया दररोज झपाट्याने कमकुवत होत चालल्यामुळे महागाईत भर पडत आहे. मागच्या महिन्यात 90 रुपयाला असलेला डॉलर आता 92 रुपये झालेला असतांनाही नियंत्रणासाठी कोणतीही ठोस तरतूद या बजेटमध्ये करण्यात आलेली नाही. देशातील युवक मोठ्या प्रमाणात बेरोजगारीच्या विळख्यात सापडलेले असताना रोजगारनिर्मितीसाठी स्पष्ट व प्रभावी दिशा या बजेटमधून दिसून येत नाही.

कंत्राटीकरणव खाजगीकरणाच्या धोरणामुळे कायमस्वरूपी नोकऱ्या नष्ट होत असताना सरकार जाणीवपूर्वक मौन बाळगत असल्याचे चित्र आहे. गडचिरोली जिल्हा हा देशातील अतिदुर्गम व मागास जिल्ह्यांपैकी एक असून, गडचिरोली–चिमूर लोकसभा क्षेत्राच्या सर्वांगीण विकासासाठी किमान १० हजार कोटी रुपयांचे विशेष आर्थिक पॅकेज जाहीर करण्यात यावे, अशी मागणी यापूर्वी सातत्याने करण्यात आली होती. मात्र या बजेटमध्ये गडचिरोली जिल्ह्यासाठी कोणतीही विशेष आर्थिक मदत, उद्योग, सिंचन, आरोग्य किंवा पायाभूत सुविधांबाबत ठोस घोषणा करण्यात आलेली नाही. शेतकरी हा देशाचा कणा असल्याच्या केवळ घोषणा केल्या जात आहेत; मात्र वास्तव असे आहे की दहा वर्षांपूर्वी शेतमालाला जो हमीभाव मिळत होता, तोच भाव आजही कायम आहे. उत्पादन खर्चात प्रचंड वाढ झाली असतानाही शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढवण्यासाठी कोणतीही ठोस योजना नाही. कर्जबाजारीपणा, पीक विम्याचे अपयश आणि नैसर्गिक आपत्तीमुळे होणाऱ्या नुकसानीबाबत शेतकऱ्यांना दिलासा देणारी तरतूदही या बजेटमध्ये आढळत नाही. हे बजेट म्हणजे सर्वसामान्य नागरिक, महिला, युवक व शेतकऱ्यांच्या तोंडचा घास काढून तो मोजक्या उद्योगपती व कॉर्पोरेट घराण्यांच्या ताटात वाढण्याचे षड्यंत्र आहे. मोठी-मोठी स्वप्ने दाखवून जनतेची दिशाभूल करण्याचा हा केवळ घोषणाप्रधान प्रयत्न आहे. आगामी राज्यांतील निवडणुका डोळ्यासमोर ठेवून काही निवडक राज्यांना खुश करण्यासाठी सादर करण्यात आलेले हे बजेट म्हणजे भाजप सरकारच्या जनविरोधी धोरणाचे स्पष्ट प्रतिबिंब आहे.

- डॉ. नामदेव किरसान खासदार, गडचिरोली–चिमूर लोकसभा क्षेत्र.

## इंग्रजी कवी संमेलनाच्या अध्यक्ष-पदी गडचिरोलीचे ॲड. काटकर

**▸विदर्भ केसरी प्रतिनिधी फुलचंद वाघाडे**



गडचिरोली : वृक्षवेल राज्यस्तरीय साहित्य मंच महाराष्ट्र भारत या विभिन्न भाषिक साहित्य संस्थेद्वारे सेवाग्राम आश्रम प्रतिष्ठान (बापू कुटी) सेवाग्राम, जिल्हा वर्धा येथे दिनांक १ फेब्रुवारी २०२६ रोज रविवारला दुसरे राज्यस्तरीय कवी संमेलन संपन्न होत आहे. समारंभाचे अध्यक्ष माननीय प्रा. डॉ. चिंतामणजी कोंगरे, सिनेट सदस्य, राष्ट्रसंत तुकडोजी महाराज विद्यापीठ नागपूर, उद्घाटक मान. सुधीरजी पांगुळ नगराध्यक्ष नगरपरिषद वर्धा, आणि सहउद्घाटक मान. विपिनकुमार मोघे, माजी सैनिक भारत सरकार तथा संचालक, जयहिंद संस्था, वर्धा यांच्या मार्गदर्शनाखाली संमेलन साकार होत आहे. मान. अर्चना भोसले, विजयजी तांबे, सचिव सेवाग्राम आश्रम प्रतिष्ठान, नरेंद्र पोतदार गोंदिया, सूरज भोईर मुंबई, शबाबारावजी तुराळे सेवाग्राम, आदी मान्यवरांची प्रमुख उपस्थिती राहील. मान. नागनाथजी बडे, हे मराठी भाषेतील कवी संमेलनाचे अध्यक्ष राहतील. मा. योगेश तांदूळकर यांच्या अध्यक्षतेखाली हिंदी भाषा कवी संमेलन होईल. इंग्रजी भाषेतील कवी संमेलनाचे अध्यक्षपदी बँक ऑफ इंडिया स्वयंरोजगार प्रशिक्षण संस्था गडचिरोलीचे माजी प्रशिक्षक तथा समन्वयक ॲड. डॉ. पी. डी. काटकर सर यांची निवड झाली असल्याने आमच्या गडचिरोली जिल्ह्याकरीता निश्चितच भूषणावह बाब आहे. मा. काटकर सरांनी जिल्हा आंग्लभाषा केंद्र, जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था बाबूपेठ चंद्रपूर येथे जिल्हा समन्वयक व मुख्य प्रशिक्षक म्हणून सेवा केली असून विदर्भातील शेकडो शिक्षकांना इंग्रजी भाषा अध्यापनाचे प्रशिक्षण दिले आहे. ॲड. डॉ. पी. डी. काटकर सर हे भिडेवाडाकार कवी मा. विजय वडवेराव द्वारा आयोजित सलग दोन्ही वर्षे पुणे येथिल आंतरराष्ट्रीय फुले फेस्टिवलचे अध्यक्ष होते. डॉ. बाबासाहेब आंबेडकर साहित्यिक विचारमंच रत्नागिरी महाराष्ट्र भारत, या संस्थेचे ॲड. पी. डी. काटकर सर हे नागपूर विभागिय अध्यक्ष असून नाट्यश्री कलामंच, झाडी बोली साहित्य मंडळ, वृक्षवेल साहित्य मंच, अष्टपैलू संस्कृती साहित्य मंच मुंबई अशा अनेक साहित्य संस्थांशी निगडित आहेत. संविधान दूत आणि आंतरराष्ट्रीय फुलेप्रेमी समाजभूषण पुरस्कार प्राप्त काटकर सरांचे दोन कवितासंग्रह प्रकाशित झालेले असून साहित्य, शिक्षण व समाजसेवेकरीता त्यांना अनेक पुरस्कार व सन्मान प्राप्त झालेले आहेत. इंग्रजी भाषिक कवी संमेलनाचे अध्यक्षपद देऊन वृक्षवेल राज्यस्तरीय साहित्य मंच या संस्थेने योग्य व्यक्तीची निवड करुन सरांचा यथोचित सन्मान केला आहे. त्यामुळे सर्व चाहते व मित्र परिवार डॉ. काटकर सरांचे अभिनंदन करीत आहेत.

# रामनगर येथे श्री प्रभू विश्वकर्मा जयंती उत्सव उत्साहात

## नगराध्यक्ष प्रणोती सागर निंबोरकर यांची प्रमुख उपस्थिती

**▸विदर्भ केसरी प्रतिनिधी : फुलचंद वाघाडे**

गडचिरोली : दरवर्षीप्रमाणे यावर्षीही श्री प्रभू विश्वकर्मा पांचाळ समाज सेवा समिती, रामनगर, गडचिरोली यांच्या वतीने श्री प्रभू विश्वकर्मा जयंती उत्सव अत्यंत भक्तिभाव व उत्साहात साजरा करण्यात आला.

या जयंती उत्सवाला नगराध्यक्ष प्रणोती सागर निंबोरकर यांची प्रमुख उपस्थिती लाभली. जयंतीनिमित्त दिवसभर विविध धार्मिक, सांस्कृतिक व सामाजिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमाची सुरुवात समाज बांधवांच्या एकत्रीकरणाने करण्यात आली. त्यानंतर पारंपरिक पद्धतीने कलश यात्रा व पालखी मिरवणूक काढण्यात आली. समाजातील महिला, युवक व लहान मुले मोठ्या उत्साहात या मिरवणुकीत सहभागी झाले होते. यानंतर श्री प्रभू विश्वकर्मा मूर्तीचे विधिवत पूजन करण्यात आले. महिलांसाठी आयोजित हळदी-कुंकू कार्यक्रमास महिलांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. यावेळी समाजातील महिलांनी नगराध्यक्ष प्रणोती सागर निंबोरकर यांचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत व अभिनंदन केले. तसेच गोपाळकाला कार्यक्रम, लहान मुला - मुलींचे सांस्कृतिक कार्यक्रम, विविध स्पर्धा, बक्षीस वितरण आणि शेवटी स्नेहभोजनाचे आयोजन करण्यात आले होते. या संपूर्ण कार्यक्रमाचे अध्यक्षपद प्रकाश किरमीरवार यांनी भूषविले. तर उपाध्यक्ष निलेश बद्दलवार, सचिव प्रफुल विरगंमवार, कोषाध्यक्ष सचिन चोलूरवार, सहसचिव रोशन यज्ञुरवार यांनी कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी विशेष परिश्रम घेतले. तसेच योगेश देवजवार, महेश मुरमुरवार, विजेंद्र कंठिवार, रोशन येरोजवार यांच्यासह इतर सदस्य, मार्गदर्शक मंडळी व समाज बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी नगराध्यक्ष प्रणोती सागर निंबोरकर यांनी समाजाच्या एकतेचे, परंपरेचे व सामाजिक कार्याचे कौतुक केले. अशा उपक्रमांमुळे समाजात एकोपा वाढतो व नव्या पिढीला संस्कार मिळतात, असे त्यांनी आपल्या मनोगतात सांगितले. तसेच सर्व समाजबांधवांना श्री प्रभू विश्वकर्मा जयंतीच्या शुभेच्छा दिल्या. संपूर्ण कार्यक्रम शांततापूर्ण व आनंदी वातावरणात पार पडला. उपस्थित नागरिकांनी आयोजकांचे कौतुक करत समाधान व्यक्त केले.








# पाहिजेत

'दैनिक विदर्भ केसरी' या अग्रगण्य मराठी वृत्तपत्राचा विस्तार संपूर्ण विदर्भात होत आहे. लोकशाहीचा चौथा स्तंभ बळकट करण्यासाठी आणि जनसामान्यांचे प्रश्न मांडण्यासाठी आम्हाला विदर्भातील प्रत्येक जिल्हा आणि तालुका पातळीवर उत्साही, कल्पक आणि अनुभवी 'बातमीदार/प्रतिनिधी' नियुक्त करणे आहे.

## खालील सर्व जिल्हे आणि त्यांच्या अंतर्गत येणाऱ्या प्रत्येक तालुक्यासाठी प्रत्येकी १ प्रतिनिधीची नियुक्त करणे आहे

### नागपूर
जिल्हा प्रतिनिधी
- नागपूर शहर,
- काटोल, नरखेड,
- सावनेर, रामटेक,
- हिंगणा, उमरेड इ.

### अमरावती
जिल्हा प्रतिनिधी
- अमरावती शहर, अंजनगाव सुर्जी,
- चांदूर बाजार, मोर्शी
- धामणगाव रेल्वे, चांदूर रेल्वे,
- मोर्शी, तिवसा, वरूड, इतर

### अकोला
जिल्हा प्रतिनिधी
- अकोला शहर, अकोट,
- बाळापूर, पातूर,
- तेल्हारा, इ.

### यवतमाळ
जिल्हा प्रतिनिधी
- यवतमाळ शहर दिग्रस,
- दारव्हा,वणी,
- पांढरकवडा, आर्णी इ.

### बुलढाणा
जिल्हा प्रतिनिधी
- बुलढाणा, चिखली,
- खामगाव, शेगाव,
- मलकापूर, देऊळगाव
- राजा इ.

### चंद्रपूर
- चंद्रपूर शहर,
- बल्लारपूर,
- वरोरा, भद्रावती,
- राजुरा, ब्रह्मपुरी



### आकर्षक वेतन

संगणक चालक
पेज डिझायनर.

- कोरल
- फोटोशॉप
- इनडिझाईन
- क्वॉर्क
- ज्ञान आवश्यक

- वर्धा जिल्हा वर्धा शहर, हिंगणघाट, आर्वी, देवळी, सेलू, कारंजा इ.
- गोंदिया गोंदिया, तिरोडा, अर्जुनी मोरगाव, देवरी, आमगाव इ.
- भंडारा भंडारा, तुमसर, पवनी, साकोली, लाखांदूर इ.
- गडचिरोली जिल्हा प्रतिनिधी गडचिरोली, अहेरी, चामोर्शी, देसाईगंज (वडसा), एटापल्ली इ.
- वाशिम शहर कारंजा लाड, रिसोड, मालेगाव, मानोरा.

वरील तालुका जिल्हा प्रतिनिधीसाठी इच्छुक असणाऱ्यानी आपला बायोडाटा (Biodata) आणि आधार कार्डची प्रत खालील व्हॉट्सअॅप नंबरवर पाठवावी किंवा संपर्क साधावा.

**कुणाल गायकवाड (जिल्हा प्रतिनिधी) मो.9579367474**
**अमोल कंटाळे (संपादक ) मो 9975532291**